# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ६ ■ सप्टेंबर २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ४४
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 6 ■ September 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44



सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके !
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते!!


आमच्या
साथीने करा
गृहसौख्याचा
श्रीगणेशा
हक्काचं घर असावं हे कुटुंबातल्या प्रत्येकाचं स्वप्नं असतं. हे स्वप्नं साकारण्यासाठी 'जनता गृहकर्ज योजना' घेऊन आम्ही आहोत सदैव तुमच्या सोबत. जनता बँक गृहकर्ज म्हणजे सहज सोपी प्रक्रिया, परवडणारे दर आणि तत्पर सेवा. तेव्हा नवीन घराचे स्वप्नं साकार करा आणि सुखी आयुष्याचा श्रीगणेशा करा!
सर्व गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!
जनता
गृहकर्ज
योजना
• व्याजदर ७.७५%* पासून सुरु
• रु. ३ कोटींपर्यंत अर्थसहाय्य
• परवडणारे EMI
*अटी व नियम लागू.
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – पंचवीस : अंक ६ वा
शके १९४७
सप्टेंबर २०२५

संपादक
**श्री. रविकांत कळंबकर**
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

[redacted]

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार-प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... श्रावण भाद्रपद – सणांची दौलत
रविकांत कळंबकर ............ ०५
✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ............ ०६
✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले ............ १९
✦ ज्येष्ठा गौरीपूजन – सण समृद्ध मराठी परंपरेचा!
ॲड. स्वाती जेरे ............ २१
✦ सज्जनगड
............ २३
✦ स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र – भाग २
काशीनाथ देवधर ............ २५
✦ स्वातंत्र्यानंतर दिल्लीतील मुस्लीम लीगींची बंडाळी
डॉ. गिरीष आफळे ............ २८
✦ पुराणातील इतिहास आणि इतिहासातील पुराण – लेखांक ८
हणमंत नाडगौडा ............ ३१
✦ ऑपरेशन महादेव
............ ३३
✦ असून अडचण नसून खोळंबा
अजित परांजपे ............ ३५
✦ जनपळभर म्हणतील हाय हाय
ब्रह्मानंद घुगरे ............ ३९
✦ राष्ट्रकूट राजांची मंदिरे
शंतनू परांजपे ............ ४१

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

**तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता, तूच कर्ता आणि करविता**
**मोरया मोरया, मंगलमूर्ती मोरया**

**ओंकारा तू, तू अधिनायक,**
**चिंतामणी तू, सिद्धी विनायक**
**मंगलमूर्ती तू भवतारक,**
**सर्वसाक्षी तू अष्टविनायक**
**तुझ्या कृपेचा हात मस्तकी,**
**पायी तव मम चिंता**

**देवा सरु दे माझे मी पण,**
**तुझ्या दर्शने उजळो जीवन**
**नित्य कळावे तुझेच चिंतन,**
**तुझ्या धुळीचे भाळी भूषण**
**सदैव राहो ओठांवरती,**
**तुझीच रे गुण गाथा**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# श्रावण, भाद्रपद - सणांची दौलत!

## संपादकीय

दिवाळी ही सणांचा राजा म्हणून संबोधली जाते. पण, सणांचा महिना हा श्रावण. कारण, श्रावणातील प्रत्येक वार, तिथी हा काहीना काही सणांचे महत्त्व सांगत असतो. सोमवार, मंगळवार, शुक्रवार आणि शनिवार हे सर्व वार महत्त्वाचे असतात. नागपंचमी, नारळी पौर्णिमा म्हणजेच राखी पौर्णिमा, गोकुळाष्टमी, बैलपोळा म्हणजेच तिसांपैकी जवळजवळ वीस दिवस जणू महत्त्वाचे असतात. उन पावसाचा खेळ करत निसर्ग पण भरभरून साथ देत असतो आणि या महिन्यात कहाणी वाचून बोधकथा पण संस्कार घडवत असतात. या पार्श्वभूमीवर भाद्रपदाचे आगमन होते.

भाद्रपद म्हटले की गणपती, गौरी आणि दुसरा पंधरवडा पितृंचा आणि शेवट सर्वपित्री अमावस्या हा महिना जणू निसर्ग चक्राचा एक फेरा पूर्ण करून दुसऱ्याची सुरुवात करणारा आहे असे वाटते. गणपती जणू नवीन वर्ष घेऊन येतात तर पूर्वजां प्रती कृतज्ञता व्यक्त करून मागील वर्षाला विराम दिला जातो.

घराघरातील गणपती सार्वजनिक होऊन आता शेसव्वाशे वर्षे होतील. गणेशोत्सव केवळ महाराष्ट्र किंवा भारता पुरताच मर्यादित राहिला नसून परदेशातही याचा आनंद पोहचला आहे. विशेषतः मराठी माणूस जिथे जिथे आहे तिथे गणेशोत्सव होणारच. याच दहा दिवसांत अजूनही एक महत्त्वाचा सण साजरा होत असतो, तो म्हणजे गौरीपूजन. महाराष्ट्रात या सणाची परंपरा, पद्धत, महत्त्व थोडे फार वेगवेगळे असले तरी धनधान्य, सुख समृद्धीचे पूजन करण्याचा भाव मात्र एकच आहे.

महाराष्ट्र हा प्रामुख्याने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ अश्या चार भागात विभागलेला आहे. मराठवाड्याचाच काही भाग हा खान्देश म्हणून ओळखला जातो. प्रादेशिक भौगोलिक भाग लक्षात घेऊन गौरी, ज्येष्ठा गौरी किंवा महालक्ष्मी अशा नावाने घराघरात गणपतीच्या दहा दिवसातील हे तीन दिवस भक्ती भावनेने भारावलेले असतात. एखादी स्त्री आपल्या बाळाला घेवून ज्या वेळी माहेरी येते त्या वेळी बाळ प्रथम पळत जावून आजोळच्या घरात प्रवेश करतं आणि मग पाठोपाठ आई घरात येते. अगदी तसंच गणपतींच्या मागोमाग तीन दिवसांनी महालक्ष्मी माहेराला येत असते. हा भावच स्त्रियांना उत्साह व उर्जा देत असतो.

ह्या तीन दिवसांत मराठी कुटुंबात आपापल्या स्तराप्रमाणे समृद्धीचे दर्शन घडत असते. देवी समोरील आरास, फराळाचे पदार्थ, मिठाई, भाज्यांची मांडणी, धान्यांच्या राशी, महालक्ष्मींची वस्त्र व अलंकारांनी केलेली पूजा हे सर्व खरोखरीच ते घर समृद्धीच्या अभिमानाने उजळून निघते. गौरी आगमन, पूजन व विसर्जन असे तीन दिवस असतात. पूजन व भोजनाने माहेरवाशिण खरच तृप्त होत असतात. गोडासाठी जरी पंचपक्वान्न असले तरी प्रत्येक घरात पूरणाचा मान मोठा असतो. कारण गरीबातील गरीब घरात किमान गुळ व हरभरा डाळ शिजतेच व हेच श्रीमंतांकडे पण झाले पाहिजे हाच एक रस समरसतेचा संदेश आपल्या संस्कृतीने आपल्याला दिलेला आहे.

गणेश विसर्जनानंतर कृष्णपक्ष हा पितृपंधरवडा म्हणून समजला जातो. मागील सात जन्मांचे कर्म बरोबर घेऊन चालू जीवनाची वाटचाल होत असते असे मानल जाते. वडीलोपार्जित मिळालेल्या पुण्याच्या ठेवी असोत की पापाचे कर्ज असो जन्मतःच हा हिशोब आपल्या खात्यात आलेला असतो. आपल्या जीवनातील उलाढाल हा हिशेब पुढे नेत असतो. आत्म्याचे स्नान ध्यानाने होत असते, तर दानाने आत्म्याचा मान वाढत असतो. या दोन्हींचे महत्त्व प्रत्येकाने जाणले पाहिजे. विज्ञान युगात हे ज्ञान जरी अज्ञानासारखे वाटत असले तरी आध्यात्मिक क्षेत्रात याला मोठे स्थान आहे. कृतत्रतेचा भाव मनात ठेवून पितृपंधरवड्यात त्या त्या दिवशीचे महत्व लक्षात घेवून आपल्या पूर्वजां प्रती निश्चितच आभार व्यक्त करावेत. त्या त्या आत्म्यांच्या चालू असलेल्या जीवन प्रवासात शांतीसाठी जरुर श्रद्धा व भावना आपापल्यापरीने पोहोचवाव्यात. गेल्या वर्षी सर्व पित्री अमावस्येला एका सामूहिक श्राद्ध विधीच्या कार्यक्रमात सहभागी झालो होतो. तिथे केवळ माझे घराण्यातीलच नाही तर जवळचे नातेवाईक, मित्र, गुरु, माझे आदर्श, सैनिक, देशभक्त यांचे प्रति ऋण व्यक्त करता आले. देशाच्या पुढील भवितव्यासाठी सर्वपितृ अमावस्येला प्रत्येकाने हा भाव जरुर जागृत करावा असे वाटते.

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**







# धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाबरोबरच विहिपचे आरोग्य सेवाकार्य

## केंद्रीय राज्यमंत्री श्री मुरलीधरअण्णा मोहोळ

भक्तीभाव आणि श्रद्धायुक्त हिंदू समाजाचे विराट दर्शन म्हणजे आषाढी वारी. महाराष्ट्राचे हे सांस्कृतिक वैभव. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगतगुरु श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यामध्ये वारकरी बंधू-भगिनींसाठी विश्व हिंदू परिषदेतर्फे दरवर्षी मोफत वैद्यकीय तथा आरोग्य सेवा पुरवली जाते. वारीबरोबर राहणाऱ्या आरोग्य पथकामध्ये ५ म्बुलन्स, डॉक्टर्स,नर्सेस आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांचा समावेश असतो. गरजूंची आरोग्य तपासणी करून उत्तम दर्जाची औषधे मोफत पुरवली जातात.

गेले ३८ वर्षे हा उपक्रम अविरत चालू आहे. यावर्षी सुरू होणाऱ्या आरोग्य सेवा उपक्रमाचे उद्घाटन दिनांक २१ जून रोजी केंद्रीय राज्य मंत्री, पुण्याचे खासदार श्री मुरलीधरअण्णा मोहोळ आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांच्या हस्ते श्री पालखी विठोबा चौक, भवानी पेठ, पुणे येथे करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री श्री किशोर चव्हाण, मुंबई क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख श्री संजय मुरदाळे, प्रांत धर्मप्रसार प्रमुख संजय कुलकर्णी, प्रांत धर्माचार्य सह प्रमुख नागनाथ बोंगरगे, विशेष संपर्क प्रांत सह प्रमुख श्रीकांत चिल्लाळ, प्रांत बजरंग दल संयोजक नितीन महाजन, प्रांत समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी, विभाग मंत्री धनंजय गायकवाड, केतन घोडके, सिंहगड भाग अध्यक्ष शरदजी जगताप, कसबा जिल्हा उपाध्यक्षा लीनाताई भावे जिल्हा मंत्री विजय कांबळे तसेच अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते व वारकरी उपस्थित होते.

श्री किशोर चव्हाण यांनी याप्रसंगी बोलताना गेली ३८ वर्षे सातत्याने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व जगतगुरु श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यामध्ये पुणे ते पंढरपूर पर्यंत उत्तम व मोफत आरोग्य सेवा देत आहे. संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्यात त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर सुद्धा आरोग्य सेवा देण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रांतात कार्यरत असणाऱ्या सेवा प्रकल्पांचीही थोडक्यात माहिती सांगितली. आरोग्य सेवेबरोबरच प्लास्टिक मुक्त आणि पर्यावरणपूरक वारीसाठीही प्रयत्न केले जाणार आहेत, त्यासाठी कार्यकर्ते वारी मार्गावर प्लास्टिक संकलन करणार आहेत व त्यासंबंधी जागृती करणार आहेत. तसेच वारीमध्ये गेल्या काही वर्षांपासून समाजविघातक शक्तींचा शिरकाव झाला आहे त्याला आळा घालण्यासाठीही यावर्षीपासून सजगता अभियान राबवित आहोत हेही श्री चव्हाण यांनी आवर्जून सांगितले.

आरोग्य सेवा उपक्रमाच्या प्रमुख डॉक्टर शर्वरी यरगट्टीकर या उपक्रमाचे पूर्वनियोजन आणि यात पुरवल्या जाणाऱ्या विविध सेवा याबद्दल माहिती सांगितली. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली हे आपले भाग्यच आहे असे सांगून त्यांनी आभार व्यक्त केले.

केंद्रीय राज्य मंत्री व खासदार मुरलीधरअण्णा मोहोळ यांनी विश्व हिंदू परिषदेचे विस्तृत कार्य आणि हा आरोग्य सेवा उपक्रम याबद्दल समाधान व्यक्त केले. धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाबरोबरच सेवाकार्यही इतकी वर्षे सातत्याने चालवणे हे सोपे काम नाही, यामध्ये विश्व हिंदू परिषदेचे वेगळेपण दिसून येते. वारीमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. सेवा कार्यामधून समाजाविषयी आपली भावना दिसून येते, त्यातून माणुसकीची जपणूक होते. धर्मरक्षण करण्यासोबतच व्यापक प्रमाणात सेवा कार्य विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून देशभरात केले जात आहे,हिंदू समाजाची विशेषत: वारकरी समाजाची दिशाभूल करण्याचे कितीही प्रयत्न समाजकंटकांनी

केले तरी त्याला यश मिळणार नाही याबद्दल श्री मोहोळ यांनी विश्वास व्यक्त केला.

डॉ एकनाथ पवार म्हणाले, ज्यावेळी वारकऱ्यांसाठी आरोग्य सुविधा वारीत पुरविल्या जात नव्हत्या, तेव्हापासून विश्व हिंदू परिषदेच्या वतीने वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत. आजही अखंडितपणे ही आरोग्यसेवा विश्व हिंदू परिषदेच्या वतीने देण्यात येत आहे, हे कौतुकास्पद आहे. अशा प्रकारच्या सेवा उपक्रमांमध्ये केव्हाही गरज लागली तरी ससून रुग्णालयातर्फे मदत केली जाईल याबद्दल सर्वांना आश्वस्त केले. देशभरामध्ये शहरांपासून खेड्यापाड्यांमध्ये पसरलेल्या विश्व हिंदू परिषदेच्या कार्याचाही त्यांनी उल्लेख केला.

या सेवा प्रकल्पाच्या उद्घाटनानंतर श्री पुजारी काका, डॉ शर्वरी ताई, नर्सेस तसेच उपस्थित सेवाव्रतींचा मा. मुरलीअण्णा यांच्या हस्ते कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन जिल्हा दुर्गा वाहिनी संयोजिका सौ. परदेशी ताई यांनी केले तर सूत्र संचलन विभाग सह मंत्री संतोष अंगोळकर यांनी केले. कार्यक्रमाची उत्कृष्ट व्यवस्था पूर्णपणे कसबा जिल्ह्याने केली. कार्यक्रमाची सांगता सामूहिक पसायदानाने झाली.

## वारीमुळे हिंदुधर्म सुरक्षित! - आनंद हरबोला

पिंपरी (दिनांक : १९ ऑगस्ट २०२५) 'आपल्या देशातील कुंभमेळ्यासहित विविध धार्मिक यात्रा आणि वारीसारखे सोहळे यामुळे हिंदुधर्म सुरक्षित राहिला आहे!' असे विचार विश्व हिंदु परिषदेचे अखिल भारतीय सहसेवा प्रमुख आनंद हरबोला यांनी भारतमाता भवन, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग (पिंपरी – चिंचवड लिंक रोड), चिंचवड येथे सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा विभाग आयोजित कृतज्ञता सोहळा व विश्व हिंदू परिषद वर्धापन दिना निमित्ताने आषाढी वारीत आरोग्यसेवा देणाऱ्या संस्था, डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय साहाय्यक आणि स्वयंसेवक यांना सन्मानित करताना आनंद हरबोला बोलत होते. विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद्र रामुका कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, प्रांत सेवा प्रमुख ॲड. श्याम घरोटे, बाळासाहेब वाघ, यशवंत देशपांडे, सौ शारदा रिकामे, माजी प्रांत मंत्री विजय देशपांडे, शरद इनामदार, अप्पा कुलकर्णी, पुणे विभाग सेवा प्रमुख विजय देशपांडे, माजी नगरसेवक सुरेश भोईर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

आनंद हरबोला पुढे म्हणाले की, 'साडेसातशे वर्षांची गुलामगिरी सोसूनही धार्मिक यात्रा आणि वारीमुळे निर्माण होणारी धर्मचेतना आणि राष्ट्रभाव जागृत राहिला. जातपात, भेदभाव नष्ट करीत अन् लोकसंस्कृती, लोकपरंपरा समृद्ध करून संपूर्ण समाजाला समरस करण्याचे सामर्थ्य वारीत आहे. वारीमध्ये निरंकारी होत सामील झाल्यावर मनात सेवाभाव जागृत होतो. धर्मरक्षणासाठी आपल्या अस्थींचे दान करणाऱ्या महर्षी दधिची ऋषींचा वारसा आपल्याला लाभला आहे!' रामचंद्र रामुका यांनी, 'नि:स्वार्थ भावनेतून केलेली सेवा ही सर्वश्रेष्ठ असते, असे भगवान श्रीकृष्ण यांनी म्हटले आहे. समाजातील सर्वांच्या सहभागातून गोवर्धन पर्वत उचलून धरला होता. तसेच विश्व हिंदू परिषदेच्या सेवाकार्याला समाजाच्या सर्व स्तरातून सहयोग मिळतो!' अशी भावना व्यक्त केली. किशोर चव्हाण यांनी, 'धर्म रक्षति रक्षित:' हे ब्रीद घेऊन विश्व हिंदू परिषद कार्यरत असून सुमारे अडतीस वर्षांपासून वारीत आरोग्यसेवा दिली जाते. 'विश्व हिंदू परिषद स्थापनेतच सेवा हा आत्मा आहे, विश्व हिंदू परिषदेची स्थापना, कार्य या बाबतीत माहिती दिली!'

अखंड भारतमाता आणि श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिवार ओंकार तसेच एकात्म मंत्रपठण करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी प्रास्ताविकातून, आरोग्यवारीत सोळा डॉक्टर्स, आठ परिचारिका, दोन मदतनीस, सोळा स्वयंसेवक, सतरा देणगीदार आणि सोळा रुग्णवाहिका यांनी योगदान दिले. त्यामुळे सुमारे साडेपाच लाख वारकरी सेवेचे लाभार्थी झाले, अशी माहिती दिली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आरोग्यसेवा देणाऱ्या व्यक्तींना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सन्मानार्थींनी उत्स्फूर्तपणे मनोगते व्यक्त करीत अनुभवकथन केले.

जिल्हा मंत्री धनंजय गावडे, बालघरे संभाजी, मधुसूदन जैन, सौ बालघरे पल्लवीताई, सौ प्रज्ञा फुलपगार यांनी संयोजनात सहकार्य केले. नवनाथ साकोरे यांनी सूत्रसंचालन केले. विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष ॲड. ललित झुनझुनवाला यांनी आभार मानले. सामुदायिक शांतिमंत्राने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.








# विहिंप द्वारा आषाढी वारी मध्ये मोफत आरोग्य सेवा

विश्व हिंदू परिषदेद्वारा आषाढी वारी मधे मोफत आरोग्य सेवा कार्य गेली ३८ वर्षे सुरू आहे. यावर्षी दि.२१ जून रोजी पालखी विठोबा चौक, भवानी पेठ, पुणे येथून श्री ज्ञानेश्वर महाराज आणि श्री तुकाराम महाराज पालखी बरोबर म्बुलन्स मधून औषधे घेऊन सर्व कार्यकर्ते मार्गस्थ झाले.

वारीच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमही राबविले जातात. यंदा प्लास्टिकमुक्त वारी यासाठी विश्व हिंदू परिषदेने विशेष योजना केली होती. अनेक कार्यकर्त्यांनी वारी मध्ये चालणाऱ्या वारकऱ्यांना निवासाच्या आणि विसाव्याच्या ठिकाणी कशी स्वच्छता राखावी याबाबत माहिती सांगितली तसेच अनेक ठिकाणी प्लास्टिकच्या कचऱ्याचे संकलनही केले.

आरोग्य सेवा देताना डॉक्टरांना मदत होईल अशी काही कामे कार्यकर्त्यांनी देखील केली. उदा.

१) कफ सिरप चे औषध देणे

२) पायाच्या पेशंटला मालिश साठी पाठवणे

३) मालिश करण्यासाठी औषध देणे

४) पायाच्या पेशंटला ड्रेसिंग करता डॉक्टर कडे पाठवणे

५) मोठ्या मोठ्या औषधांच्या स्ट्रिप्स कट करून ठेवणे .

विहिंप मातृशक्ती आयामाच्या सहकार्याने दोन्ही मार्गांवरील डॉक्टर आणि कार्यकर्ते यांचे एकूण १६ ते १७ जणांची निवास तसेच भोजन व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी आपल्या परिवारातील मंडळींनीही मोठे योगदान दिले.

१) माउली श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग

अनुक्रमे सासवड, हडपसर, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव, फलटण, बरड, नातेपुते, माळशिरस, वेळापूर, भंडी शेगाव आणि वाखरी या ठिकाणी सेवा देण्यात आली.

२) जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी मार्ग

हडपसर, उरळीकांचन, यवत, कांचन फाटा, पाटस, उंडवडी, बरामपुर, बारामती, काटेवाडी, भवानीनगर, बेलवाडी, अंतुरणे, गोतवडी फाटा, निमगाव, इंदापूर, वडापूर, अकलूज येथे दोन दिवस, माळीनगर, भोरगाव, दसुर फाटा, पिराची कुरोली आणि वाखरी या सर्व ठिकाणी आरोग्य सेवा देण्यात आली.

सकाळी ९ ते १:३०, दुपारी ३ ते ७ असे एकूण १५ दिवस पालखी बरोबर म्बुलन्स आणि आरोग्य पथकाचा प्रवास झाला. त्यातील १४ दिवस पूर्ण सेवा दिली गेली.

आरोग्य सेवा लाभार्थी संख्या

संत श्री. ज्ञानेश्वर माऊली मार्गावरील एकूण पेशंट संख्या : २,९५,०००.

जगद्गुरु संत श्री. तुकाराम महाराज मार्गावरील एकूण पेशंट संख्या : २,४६,५००

आषाढी वारी प्रकल्प २०२५ एकूण लाभार्थी संख्या : ५,४१,५००

श्री. किशोरजी चव्हाण (पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री), श्री. सतीशजी गोरडे (पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री), श्री. व्ही एम देशपांडे (पिंपरी चिंचवड जिल्हा मातृशक्ती दुर्गा वाहिनी आयाम पालक), श्री. पुजारी काका (वारी सेवा प्रमुख), श्री. विजयराव देशपांडे (प्रांत सेवा विभाग, पिंपरी चिंचवड जिल्हा), श्री. यशवंतराव देशपांडे (वारी प्रकल्प ज्येष्ठ कार्यकर्ते), श्री. गोडबोले काका (वारी




प्रकल्प ज्येष्ठ कार्यकर्ते) यांच्या नेतृत्वामध्ये यावर्षी आषाढ वारी आरोग्यसेवा देण्यात आली.

यावर्षी प्रामुख्याने औषधोपचार सेवा आणि औषध संकलन यासाठी फार्मासिटिकल कंपनी डॉक्टर्स आणि फार्मासिस्ट यांनी मदत केली त्यांची सूची खालील प्रमाणे :

श्री.जगन्नाथजी शिंदे (महाराष्ट्र ड्रग्स अँड केमिस्ट) चठठ फार्मासुटीकल कंपनी, श्री. बादमसाहेब कुंडमलबा (अधिकारी औंध रुग्णालय), न्यू लाइफ फार्मासुटिकल कंपनी पिंपरी, लोढा डिस्ट्रीब्यूटर बारामती, डॉक्टर डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (पिंपरी) डॉ. पाळवदे, (छत्रपती संभाजीनगर), श्री. मधुकर जी बच्चे व मित्र परिवार, डॉ. ताम्हाणे बंधू श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल, श्री. विनोद जी रांका (पिंपळे सौदागर), श्री. रवींद्र मराठे, पु . ना. गाडगीळ आणि कंपनी यांनी आर्थिक सहकार्य केले. त्यांचे मनःपूर्वक आभार.

मुंबई क्षेत्र मंत्री श्री. संजयजी मुद्राळे (विश्व हिंदू परिषद पश्चिम प्रांत धर्मप्रसार प्रमुख), श्री. मकरंदजी घळसासी (केंद्रीय प्रचार प्रसार विभाग), श्री. संजयजी कुलकर्णी (विश्व हिंदू परिषद सेवा विभाग जेष्ठ कार्यकर्ते, प्रांत धर्माचार्य विभाग प्रमुख), श्री नागनाथजी बोंगरगे (प्रांत धर्माचार्य सह संयोजक) यांनी या प्रकल्पासाठी मार्गदर्शन केले.

मानव सेवा हीच ईश्वर सेवा मानून आपण सर्व आरोग्यकर्मी हे काम असेच एकजुटीने करत राहू आणि समाजाला सेवा देत राहू असे सर्वांच्या वतीने सांगितले. – श्री.बाळासाहेब वाघ

मातृशक्ती सौ. अरुणाताई माने (संयोजिका इचलकरंजी जिल्हा) म्बुलन्स बरोबर जाणारे डॉक्टर्स आणि नर्सेस यांसह आरोग्य वारीमध्ये सहभागी होण्यासाठी यावेळी उपस्थित होत्या.

या वर्षी वारीला भेट देण्यासाठी विहिंप.चे अनेक अधिकारी आले होते.

श्री. अनिरुद्धजी पंडित (प्रांत संघटन मंत्री), श्री. धनाजी शिंदे (मठ मंदिर पूजा अर्चक प्रमुख), श्री. भाऊराव कुदळे (कर्णावती क्षेत्र आणि मुंबई क्षेत्राचे गोसेवा प्रमुख), श्री. संतोष जी वांजळकर (बारामती), श्री. बेलसरे (सहयोग फाउंडेशन), श्री. मकरंदजी घळसासी (केंद्रीय प्रचार प्रसार टोळी सदस्य), मातृशक्ती सौ. शारदा ताई रिकामे (प्रांत मातृशक्ती सहसंयोजिका आणि सत्संग संयोजिका), सौ. देशपांडे (मातृशक्ती कोथरूड)

आदी मान्यवरांनी पालखी मार्गावर भेट दिली.


मावळ मुळशी जिल्ह्यातून खास वारी सेवा देण्यासाठी श्री. अमित जी भेगडे, (बजरंग दल जिल्हा संयोजक), श्री. सचिन जी शेलार (जिल्हा निधी प्रमुख), श्री. महेंद्रजी असवले (जिल्हा मंत्री), श्री. योगेश जी गुनाट (जिल्हा सहमंत्री) यांनी माळीनगर ते पंढरपूर पर्यंत सेवा देण्यासाठी ते आपल्या आरोग्य सेवा पथकाबरोबर होते.

पश्चिम महाराष्ट्र प्रांत आरोग्य सेवा विभाग

१) माउली ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (प्रमुख – श्री. पुजारी काका)

२) जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (प्रमुख – श्री बाळासाहेब वाघ)

सेवानिवृत्त परिसेविका सौ. रेखा थिटे, सौ. सुनीता माने, सौ.रचिता नाईक, सौ. उषा सातव (माऊली ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर उपस्थिती, संपूर्ण वारी मधील कालावधी)



पहिल्या टप्प्यात डॉ. प्रवीण जगदाळे आणि डॉ. प्रिया बुळबुले (संभाजीनगर) डॉक्टर वैभवी आणि डॉ वैष्णवी (पनवेल मुंबई) आणि डॉ. शर्वरी यरगट्टीकर (चिंचवड) यांनी सेवा कार्य केले. दुसऱ्या टप्प्यात डॉ. तोडकर (कोल्हापूर), डॉ. तराळे (अंदरपुर) आणि श्री.भरत मजारी (OT Assistant) तालुका कागल येथून सेवा देण्यासाठी आले होते.

संत तुकाराम पालखी मार्गावर डॉ.चौधरी, डॉ. श्री. व सौ. वैद्य – पाटस, डॉ. रणजीत लोखंडे (अकलूज क्रिटिकल केअर सेंटर), डॉ. शरद मेंडके (इक्चड कसबा तारके कोल्हापूर), डॉ. शर्वरी यरगट्टीकर – पिंपरी चिंचवड जिल्हा मातृशक्ती संयोजिका, सौ. शारदाताई रिकामे (पश्चिम महाराष्ट्र प्रांत मातृशक्ती सह – संयोजिका आणि सत्संग संयोजिका) यांनी आरोग्य सेवेमध्ये सहभाग घेतला.

फार्मसीस्ट मातृशक्ती सौ राजश्रीताई वाघचौरे (तळेगाव, मावळ मुळशी जिल्हा संयोजिका), मातृशक्ती सौ. अनिताताई पडवळ (मोशी पिंपरी चिंचवड जिल्हा) यांचाही सहभाग होता.

यावर्षी श्री. रविंद्र जी मुळे यांनी स्वयंसेवक म्हणून सर्व प्रकारचे कामे करण्यामध्ये सहभाग घेतला.

डॉक्टर चौधरी, डॉक्टर श्री. व सौ. वैद्य (पाटस) डॉक्टर देशपांडे (पाटस) त्याचबरोबर परिसेविका सौ. रजत ताई सौ. पखाले ताई, सौ. गंगा ताई सातव, सौ. देशपांडे बाई पाटस, श्री. नितीनजी कौसे, श्री. अभिषेक जी शिंदे श्री. नितेश जी विश्वकर्मा, श्री. सुनील जी जाधव व श्री. दीपक जी डावखे इत्यादी सेवा देण्यासाठी उपस्थित होते.

वारीच्या दोन्ही मार्गांवर निवास आणि भोजन सेवा देणारी काही कुटुंबे विश्व हिंदू परिषद वारी नियोजनासाठी आनंदाने मदत करतात; त्यांतील काही नावांची सूची खालीलप्रमाणे

श्री. ब्राह्मणकर काका, श्री. व सौ. चोरमले, श्री. बाळासाहेब सरोदे, श्री. रासकर काका, श्री. खाडे, श्री. दोरगे सर, श्री. सुरेश अण्णाप्पा धोत्रे (हडपसर, महाराष्ट्र राज्य माजी संचालक आरोग्य विभाग), श्री. एकनाथ चौधरी आणि श्री अक्षय चौधरी (उरळी कांचन,) श्री. विकास रणभोर डॉक्टर, श्री व सौ वैद्य (पाटस), श्री. संजयराव देशपांडे (पाटस), डॉक्टर सचिन पिसाळ (श्रीपुर), श्री. विष्णू यादव (धारेटकर मळा, बावडा), श्री कल्याण कापसे (दसुर, पिराची कुरोली), श्री. डीनू कापरे (जेजुरी), श्री. अभिजीत लोखंडे (मेडिकल शॉप कडूस), श्री. उद्धव सावंत (बोंडले, दसुर), श्री. आप्पा साहेब जगताप आणि श्री. रावसाहेब जगताप, श्री. गुलाब खामकर (उडवंडी), श्री. प्रमोद जगताप (सणस), श्री. शेखर जाधव (बारामती), श्री. दीपक कुलकर्णी (बारामती), डॉक्टर श्री. देशपांडे (वेळापूर), श्री. बारटक्के काका, श्री. व सौ. अडसूळ (फलटण), श्री. रावसाहेब जगताप, सौ. मंदाकिनीताई कमलाकर देशपांडे

या सर्वांच्या सहकार्यामुळे सर्व पथकांना भोजन आणि निवास सोयीचे झाले.

नामस्मरण, भजन, कीर्तन आणि चिंतनात रंगलेले हे २ आठवडे! अखंड उर्जेने भरलेले ! वारकऱ्यांची सेवा करताना सर्व सेवेकरी अरोग्यकर्मी हरपून गेले होते. वारी सेवा ही फक्त वयोवृद्धांनी सहभागी होण्याची गोष्ट आहे, हा समज तरुण डॉक्टरांच्या सक्रिय सहभागामुळे खोटा ठरला. वारीत होणारी घुसखोरी ही चिंतेची बाब; या विषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून या संदर्भातील पुस्तके भाविकांना वाटण्यात आली. काही व्हिडिओ तयार करण्यात आले. प्रतिसाद छान होता. वारीचे पावित्र्य जपणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यासाठीच यासाठी हा छोटासा प्रयत्न होता.

भक्ती म्हणजे डोळे मिटून बसणं नाही... तर डोळे उघडे ठेवून समाजासाठी झटणं आहे!

अशाप्रकारे आषाढी वारी हा प्रकल्प पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा कार्यासाठी एक सुवर्णसंधी ठरला.

लाखो वारकऱ्यांच्या सेवेची संधी लाभली, यासाठी मी स्वतःला अत्यंत भाग्यवान समजते. आणि आपण असेच पांडुरंगाच्या वारीतील निष्ठावान सेवक राहू अश्या सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देते.

।। जय जय राम कृष्ण हरी ।।

**डॉ. शर्वरी यरगट्टीकर, आरोग्य वारी समन्वयक**





## धर्माचार्य संपर्क आयाम

### कसबा भाग

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी विश्व हिंदू परिषद स्थापना दिनाचा कार्यक्रम बालाजी मंदिर भवानी पेठ प्रखंड इथे घेण्यात आला यावेळेस मुंबई गोवा क्षेत्राचे धर्मा यात्रा प्रमुख श्री संजयजी मुद्राळे सर यांनी विश्व हिंदू परिषदेच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त विश्व हिंदू परिषद ची उपलब्धी बालाजी मंदिर परिसर गुजराती वाघरी समाज जनजाती समुदायांमध्ये विश्व हिंदू परिषद स्थापना उद्दिष्ट या विषयावरती आकलन केले.

कार्यक्रमाचे आयोजन धर्माचार्य संपर्कप्रमुख श्री सुनील जी भडकवाडे यांनी केले होते यावेळेस भवानी प्रखंड लष्कर प्रखंड बालाजी मंदिर महंत लालजी दास महाराज, मंत्री तुषार केमकर सेवा विभागाचे श्री शैली जी जाधव श्री विजय कांबळे कसबा भाग मंत्री व दुर्गा वाहिनी संयोजिका सौ कार्तिकीताई परदेशी उपस्थित होत्या.

सदर कार्यक्रम भगवान बालाजी आरती व श्रीकृष्ण भगवान भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन ओमकार एकता मंत्र विजय मंत्र व सांगता पसायदानातून केली असे यावेळेस श्री मुजराळे सर यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी व संत ज्ञानेश्वर महाराज यांचे मराठीत भगवत गीतेचे भाषांतरण याविषयी अधिक माहिती समुदायाला दिली व भवानी प्रखंडतील वीर गोगादेव भगवान यांच्या २०० वर्ष पूर्ण असलेल्या गोगामडीला भेट देऊन गुगामडीचे व निशाणाचे दर्शन केले.

कळावे

**विजय कांबळे, कसबा जिल्हा मंत्री**




## दुर्गा वाहिनी आयाम

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुर्गवाहिनी आयामतर्फे महात्मा फुले प्रखंडामधील महात्मा फुले वस्ती दगडी शाळा विश्व हिंदू परिषद ६१ व्या वर्धापन दिन, संत ज्ञानेश्वर महाराज ७५०वा जन्मोत्सव, वीर गोगादेव भगवान जन्मोत्सव, व स्वातंत्र्यदिनानिमित्त दुर्गा वाहिनी शाखेची स्थापना करण्यात आली यावेळेस श्री किशोरजी चव्हाण प्रांतमंत्री श्री. श्रीकांत चिल्लाळ विशेष संपर्कप्रमुख प्रांत सौ सुरेखा कवडे ताई विभाग दुर्गा वाहिनी सुयोजिका सो कार्तिकताई परदेशी दुर्गा वहिनी संयोजिका सुकन्या काची सहदुर्गवाहिनी संयोजिका रेखाताई, वैष्णवी परदेशी कसबा भाग श्री विजय कांबळे भाग मंत्री श्री निलेश कांबळे सहमंत्री श्री प्रतीक बोबडे श्री विक्रम घुंगरू वालेश्री सोमनाथ शुद्धलकर कांचन ताई दोडे श्रमदान मित्र मंडळ कार्यकर्ते व आरती ताई कोंढरे दुर्गा व मातृशक्ती यांच्या उपस्थितीत दुर्गा वाहिनी नवीन शाखेच्या कार्यक्रम संपन्न झाला यावेळेस प्रांत मंत्र किशोरजी चव्हाण यांनी विश्व हिंदू परिषद ६१ वर्षातील उपलब्ध विषय मांडला दुर्गा वाहिनी मातृशक्ती बजरंग दल सेवा विभाग व इतर आयामची माहिती व विश्व हिंदू परिषद ची ६१ वर्षाची उपलब्धी चे आकलन केले यावेळेस हडपसर मधील दुर्गांनी दंडाची प्रात्यक्ष केली सदर कार्यक्रमाची सुरुवात भारत भारत माता श्रीकृष्ण फोटो दुर्गामाता प्रतिमेचे पूजन पुष्पहार ओमकार एकता मंत्र विजय मंत्र पासून केली व सांगता भारत माता आरती व पसायदान याच्या पठणाने झाली.

**सौ. कार्तिकीताई परदेशी, संयोजिका**

**सौ सुकन्या ताई काची, सह संयोजिका**

**दुर्गा वाहिनी, कसबा भाग**



# गुरु तेग बहाद्दर साहेबजी वर्धापन दिन

शुक्रवार, १५ऑगस्ट २०२५ रोजी, हडपसर येथील गुरुद्वारा गुरु तेग बहाद्दर साहेबजी येथे वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता माननीय श्री. किशोरजी चव्हाण, प्रांत मंत्री, सिख धर्मगुरू ग्यानीजी, चतुरसिंग राठोड, गुरुद्वाराचे संस्थापक अध्यक्ष जीवरक्षक श्री. बच्चुसिंग टाक, मातृशक्ती प्रांत सहसंयोजिका सौ.आशाताई टेकवडे, दुर्गावाहिनी विभाग संयोजिका सौ.सुरेखाताई कवडे, विहिंप हडपसर जिल्हा संस्कृत प्रमुख ह.भ.प दादा महाराज सपकाळ मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरुवातीस गुरुद्वाराची पूजा, भारतमाता पूजन व सुदर्शन श्रीकृष्णांची प्रतिमापूजन करण्यात आले. त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्र घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा मंत्री श्री.राजेंद्र शेवाळे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. श्री. बचुसिंग टाक यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना शीख धर्माचा इतिहास सविस्तर सांगितला. त्याचबरोबर सर्व हिंदू समाज एकत्र राहून धर्मांतराबाबत लढा देऊ असे सांगितले. सिख धर्मगुरू आदरणीय ग्यानीजी चतुरसिंग राठोड यांनी सांगितले की, आपल्या धर्मावर आलेले संकट आपण कशा पद्धतीने उलटवून लावली पाहिजे त्याकरिता विहिंपदेबरोबर राहून एकत्र काम करून अशी संकट आपण परतून लावू शकतो. विहिंपबरोबर एकत्र काम करू अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

ह.भ. प दादा महाराज सपकाळ यांनी धर्माच्या बाबत काही सूचना केल्या व धर्म टिकवण्याकरिता संस्कार करणे किती महत्त्वाचा आहे. हे त्यांनी सांगितले. प्रांत मंत्री श्री. किशोरजी चव्हाण यांनी विहिंपची स्थापना १९६४ साली, मुंबई येथील प्रसिद्ध संदिपनी आश्रमात पूज्य स्वामी श्री. चिन्मयानंद यांच्या अध्यक्षतेखाली आणि देशातील विविध संप्रदायाचे आचार्य धर्मगुरू, प्रमुख संत- महंत व तत्वचिंतक यांच्या उपस्थितीत जन्माष्टमीच्या पावन पर्वावर विहिंप या ईश्वरीय संस्थेची स्थापना झाली. त्यांनी सिख धर्मियाचे बलिदान यावर सविस्तर माहिती दिली. विहिंपचे मुख्य उद्देश सांगितले. त्यानंतर आयामानुसार थोडक्यात माहिती दिली. धर्मप्रसार, समरसता, गौसेवा आणि संवर्धन याबाबतही थोडक्यात माहिती दिली. तसेच नैतिक शिक्षा योजना आयामाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना रामायण, महाभारत, महापुरुषांच्या कथांच्या माध्यमातून सुसंस्कारित करण्यासाठी हजारो शाळांशी संपर्क केला जात आहे हे सांगण्यास ते विसरले नाहीत.

विहिंपच्या महिलांमध्ये चालणारे कार्य म्हणजे मातृशक्ती या माध्यमातून महिलांना संघटित करून नेहमीच चालणाऱ्या सत्संगाच्या माध्यमातून परिवारात हिंदुत्वाचे वातावरण निर्माण करणे येणारी नवी पिढी हिंदू जीवन मूल्यांच्या आधारे सुसंस्कारित करण्यासाठी साप्ताहिक संस्कार वर्ग घेणे, लव जिहाद च्या संकटापासून युवतींना सजग करणे, शिलाई, मेहंदी, ब्युटी पार्लर प्रशिक्षण देऊन महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. बजरंग दल युवकांना धर्म संस्कृती स्वाभिमानाच्या प्रतिकाराची संघर्ष करण्यास तयार करणे युवकावर संस्कार करून व्यसनमुक्ती सेवा कार्य गोरक्षा त्याचबरोबर लव जहाद पासून युवतींची सुटका, कौशल्य शिकवून स्वयंरोजगार.

दुर्गावहिनी युवतींना हिंदू संस्कार, हिंदू जीवनमूल्य शिकवणे शक्तिशाधन केंद्राच्या माध्यमातून स्वसंरक्षणास सिद्ध करणे, त्याचबरोबर संस्कार वर्ग घेण्यास प्रवृत्त करणे अशा प्रकारचे कार्य विहिंपच्या माध्यमातून चालतात, असे प्रांत मंत्री श्री. किशोरजी चव्हाण यांनी सांगितले.

समारोपावेळी शिख बांधव यांच्याकडून, विहिंपचे पदाधिकारी यांचा शाल देऊन सन्मान करण्यात आला. व पुनःश्च असे कार्यक्रम करावे, अशी अशा व्यक्त केली. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाकरिता जिल्हा उपाध्यक्ष श्री. मनोज काळे, जिल्हा सहमंत्री श्री. शशिकांत घाटे, मातृशक्ती जिल्हा संयोजिका सौ. विजयाताई रणभोर, त्याचबरोबर सर्व जिल्हा व प्रखंड पदाधिकारी कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले. त्यानंतर सर्वांचे आभार मानून शांति मंत्र व राष्ट्रीय उद्घोष घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. संख्या :-११०

**श्री. राजेंद्र शेवाळे, मंत्री हडपसर जिल्हा.**





## १५ ऑगस्ट २०२५

आज शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख उपस्थित किशोरजी चव्हाण, प्रांत मंत्री, ऋषिकेश भागवत, बजरंग दल प्रांत गोरक्ष प्रमुख, विलास जी फाटक, प्रांत कार्यालय प्रमुख यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळेस राष्ट्रगीत व ध्वजारोहण करण्यात आले. पेढे वाटण्यात आले. साडेआठ वाजता कार्यक्रमाचे समाप्ती झाली.



## अण्णा भाऊ साठे जयंती

आज दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी, समरसता आयाम तर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. सोलापूर येथील भैया चौकातील अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री श्री संजयकुमार जमादार, विभाग सह मंत्री श्री विजयकुमार पिसे, श्री अमित सारोळकर, श्री अविनाश माने, चंद्रकांत कुलकर्णी हे उपस्थित होते. विशेष उपस्थिती : माजी मंत्री श्री उत्तमप्रकाश खंदारे, श्री सुरेश पाटोळे, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष, श्री सतीश बगाडे सामाजिक कार्यकर्ते, श्री मुकुंद उकरांडे, पत्रकार.

---



## माधवनगर प्रखंड वर्धापनदिन निमित्त महाआरती

जय श्रीराम विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या वर्धापन दिवस निमित्त आज माधव प्रखंडामध्ये नीलम नगर गणपती मंदिर येथे महाआरती करण्यात आली आणि प्रसाद वाटण्यात आले यावेळेस उपस्थित विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी संजीव चिप्पा, रवी बोल्ली, अमितकुमार गडगी तसेच बजरंग दलाचे बजरंगी उपस्थित होते.


**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**

**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**



## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजाने आचरणात आणावेत

### प्रांत मंत्री किशोरजी चव्हाण

विश्व हिंदू परिषद पर्वती भागातर्फे १ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सारसबाग येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण व अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊंचे विचार समाजाने आचरणात आणावेत, असे आवाहन केले.

प्रांत धर्मप्रसार विशेष संपर्क प्रमुख विक्रम सुर्वे, प्रांत सामाजिक समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी, प्रांत दुर्गा वाहिनी सहसंयोजिका आरती भारती, पर्वती भाग अध्यक्ष तुळशीराम उणेचा, पर्वती भाग मंत्री नाना क्षीरसागर,कसबा भाग मंत्री विजय कांबळे, सह मंत्री महेंद्रसिंह चौहान, सहसंयोजक विनायक देसाई, अनिकेत मिसाळ, ऋषीकेश कामठे, दुर्गा वाहिनी सह संयोजिका अक्षता रोकडे, दिपाली मालुसरे, सोनाली शिंदे,पद्मावती प्रखंड मंत्री देवरत कसबे, अमित शिंदे,स्वयम् दळवी,उत्कर्ष कोठारी उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषद व इस्कॉन अन्नमृत फाउंडेशन यांच्या संयुक्त वतीने गेली ४ वर्षापासून अन्नछत्र चालवले जाते.





## विहिंप कडून संपूर्ण प्रांतातून जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले

छत्रपती शिवरायांविषयी विकृत इतिहासाची मांडणी इतिहासाचे विपर्यास्त करणारा वादग्रस्त खालिद का शिवाजी या चित्रपटाच्या प्रदर्शनास शासनाने प्रतिबंध करावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने केली आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाबद्दल अनेक खोटे आणि अनैतिहासिक दावे करण्यात आले आहेत. शिवरायांचा विकृत इतिहास मांडण्यात आला आहे, याकडे विहिंपने लक्ष वेधले आहे.

तसेच विहिंपने उदाहरणादाखल काही संदर्भही दिले आहेत. १) छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५% मुसलमान होते. २) त्यांच्या अंगरक्षकांपैकी ११ मुसलमान होते. ३) त्यांनी रायगड किल्ल्यावर मशिद बांधली. ४) तसेच चित्रपटाच्या शीर्षकात सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांचा (खालिद का शिवाजी) असा एकेरी उल्लेख करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील सर्व शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असून या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो, याकडेही विश्व हिंदू परिषदेने लक्ष वेधले आहे. यासंदर्भात प.महाराष्ट्र प्रांत विहिंपने काही आग्रही मागण्याही केल्या असून सर्व जिल्ह्यात सदर खालिद का शिवाजी या चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यासंबंधी जिल्ह्यातील सर्व चित्रपटगृह चालकांना सूचना द्याव्यात, चित्रपटाचे निर्माते, लेखक, दिग्दर्शक, प्रसारमाध्यमे तसेच हा चित्रपट परदेशी पाठवून शिवरायांच्या इतिहासाची मोडतोड करण्यात सामील असलेले सर्व ज्युरी, अधिकारी, मंत्री तसेच अन्य संबंधितांवर अफवा पसरवणे, अपप्रचार करणे, धार्मिक भावना दुखावणे, धार्मिक स्थळांबाबत अपप्रचार करणे या विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, असे प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी निवेदनाव्दारे केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदरी मोठ्या प्रमाणात मुस्लीम अधिक़ारी व सैन्य होते, हे धांदात खोटे आहे. यातूनच काही ठिकाणी ब्रिगेडी विचार हिंदू समाजात रूढ करण्याचा प्रयत्न आहे. सर्वधर्म समभाव हा सेक्युलर विचार अर्थात नॅरेटिव असून जिहादी मंडळी याचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.




## कर्वेनगर प्रखंडात रक्षाबंधन

विश्व हिंदू परिषद कर्वेनगर प्रखंडात कर्वेनगर पोलीस स्टेशन, लक्ष्मीनगर पोलीस स्टेशन, अलंकार पोलीस आयुक्तालय पुणे शहर मधील कार्यरत पोलीस अधिकारी यांच्या समवेत प्रखंड सदस्य व मातृशक्ती यांनी रक्षाबंधन साजरा केला. आपण सर्व जण घरी बसून आपल्या कुटुंबाबरोबर सण उत्सव साजरे करत असतो पण आपले पोलिस बांधव मात्र जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस रात्र आपले कर्तव्य बजावत असतात, त्यांचा आनंद द्विगुणित व्हावा यासाठी रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. यावेळी पोलीस बांधवांनी संघटनेची माहिती व रचना समजावून घेतली.पोलीस बांधव अविरतपणे जनतेच्या रक्षणासाठी सज्ज असतो,अशी कृतज्ञता प्रखंडाच्या वतीने पोलिस बांधवांप्रती याप्रसंगी व्यक्त केली. भाग सहमंत्री, भाग आयाम प्रमुख, मातृशक्ती, प्रखंड सहमंत्री व बाल गोपाल असे सर्व उपस्थित होते.



**संत दर्शन सोहळा :** २ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजी महाराज भाग कर्वेनगर प्रखंड येथे ह.भ.प शिवाजी महाराज मोरे (संत तुकाराम महाराज यांचे १०वे वंशज व विठ्ठल रुक्मिणी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त) देहू यांचा दर्शनाचा लाभ घडला. महामंडलेश्वर डॉ.दीपाताई राजमाने, (संस्थापक अध्यक्ष, कैवारी विकास संस्था यांच्यासोबत ह्या भेटीचा योग पार पडला. श्री. मोरे महाराज आणि दीपाताई यांच्यासोबत विहिंप कार्य, किन्नर समाज, लिंगायत, जैन समाज या विविध विषयांवर चर्चा झाली. या भेटी प्रसंगी अमित जोशी (सहमंत्री छ.सं.म.भाग), दिपकजी अष्टपुत्रे, (धर्माचार्य आयाम, संघ परिवार) मयुर बनकर (धर्माचार्य संपर्क प्रमुख), राहुल विभुते (समरसता प्रमुख) महेश बनकर (सत्संग प्रमुख) उपस्थित होते.



## पॉवरलिफ्टिंग हर्ष भाग्यशाली प्रमोद व्यास भारताचा उगवता शक्तिपुंज

२० वर्षीय हर्ष भाग्यशाली प्रमोद व्यास (शिक्षण: सायडेनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स, मुंबई) हा आज भारताच्या पॉवरलिफ्टिंग जगतातील एक चमकता तारा आहे. त्याच्या प्रवासाची सुरुवात २०२१ मध्ये पहिल्यांदा जिल्हास्तरीय स्पर्धेतून झाली आणि सिल्व्हर मेडल पटकावले. २०२२ मध्ये अनेक जिल्हा विजेतेपदे जिंकून त्याने प्रभुत्व सिद्ध केले.

राज्यस्तरीय यश : २०२२ मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी निवड झाली आणि अमळनेर येथे झालेल्या राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दोन कांस्यपदके मिळवली. हे यश त्याच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला.आरोग्य संकटातून पुनरागमन: २०२३ मध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्यानंतर गंभीर आरोग्य समस्येमुळे हर्षला स्पर्धा खेळता आली नाही. मात्र, हार न मानता २०२३ च्या शेवटी पुन्हा जिल्हा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले तसेच दिल्ली राज्य अजिंक्यपद स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावले.राष्ट्रीय व आशियाई विजय (२०२४) च्या जानेवारीत रायपूर, छत्तीसगड येथे राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्रासाठी ज्युनियर गटात सुवर्णपदक जिंकले.यानंतर देहरादून येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सब–ज्युनियर गटात भारतासाठी दोन सुवर्णपदके जिंकून आशियात भारताचा झेंडा उंचावला.जागतिक रंगमंचावर (२०२४) : आशियाई स्पर्धेतल्या अफाट कामगिरीनंतर हर्षची निवड वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि आर्नोल्ड क्लासिक पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी झाली.वर्ल्ड चॅम्पियनशिप (ऑक्टोबर २०२४): भारतासाठी तीन सुवर्णपदके आर्नोल्ड क्लासिक (२०२४): भारतासाठी दोन सुवर्णपदके पटकावली.

नवीन इतिहास (२०२५) : व्हिएतनाम येथे झालेल्या पहिल्या ज्युनियर आशियाई पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारतासाठी पुन्हा सुवर्णपदक मिळवून आपल्या विजयमालिकेला पुढे नेले.भारतासाठी ९ सुवर्णपदके जिंकून राज्य व जिल्हा स्तरावर चमकणारा खेळाडू तरुणांसाठी एक आदर्श ठरला आहे. वंदे मातरम् हे फक्त त्याचं घोषवाक्य नाही, तर त्याच्या प्रत्येक प्रयत्नामागचं बळ आहे.



## उत्तमनगर प्रखंडात आरती केंद्राची दशकपूर्ती

आरती केंद्र हा समाज एकत्रिकरणाचा व संघटनेच्या रचनेमध्ये नवीन कार्यकर्ते जोडणे आणि समाजाचे प्रबोधन करणे व सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी उपयुक्त आहे. छत्रपती संभाजी महाराज भाग पुणे येथील उत्तमनगर प्रखंडात एका अभिनव आरती केंद्राला १० वर्ष पूर्ण झाली. ११ व्या वर्षात पदार्पण केले आहे.

या केंद्रावर अनेक गोष्टी, पारंपरिक वाद्यांचा लयबद्धतेने वाढवलेला सहभाग जसे शंख, शिंगी, डमरू, टाळ, घंटा वा इत्यादी, याचबरोबर आलेल्या सर्व भाविकांचे आरती नंतर प्रबोधनामुळे अनेक नागरिक या आरती केंद्रात सहभागी होतात. दरवर्षी श्रावणात सोमवारी भस्मारतीचे आयोजन केले जाते.

यंदा महाभस्मारतीला श्री. किशोर चव्हाण, (प. महाराष्ट्र प्रांत मंत्री), श्री.नितीन महाजन, (प्रांत संयोजक, बजरंग दल), श्री.संदेश भेगडे, (सह संयोजक, बजरंग दल), सौ. प्रिया रसाळ, (प्रांत मातृशक्ती संयोजिका), श्री. ऋषिकेश भागवत, (प्रांत गोरक्षा प्रमुख), भास्कर भगत (प्रांत साप्ताहिक मिलन प्रमुख), सुशांत गाडे (प्रांत सुरक्षा प्रमुख) उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. ४ कार्यकर्त्यांपासून सुरू झालेली ही आरती आज हजारो नागरिकांपर्यंत पोहोचली आहे. या माध्यमातून संघटनेत दोनशेहून अधिक कार्यकर्ते जोडले गेले आहेत, त्यापैकी काही सध्या प्रखंड समितीमध्ये व खंड स्तरावर जबाबदार कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत.



## छत्रपती संभाजी महाराज भाग वारजे प्रखंडात संघटन महामंत्री मिलींदजी परांडे यांचे प्रबोधन

२४ जुलै छत्रपती संभाजी महाराज (पुणे) भागातील वारजे प्रखंडात श्री काळेश्वरी माता मंदिर येथे मा. मिलिंदजी परांडे (केंद्रीय संघटन महामंत्री) यांच्या हस्ते महापूजा व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मंदिर समिती कडून मा.मिलिंदजी, प्रांत मंत्री किशोरजी, अनिरुध्दजी पंडित, संजय कुलकर्णी, नागनाथ बोंगरगे यांना शिवरायांचे चांदीचे टाक, पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले. मा.मिलिंदजी यांच्याहस्ते मच्छिंद्र महाराज वाळंज, कृष्णल सोनुगुरु तागुंदे, ताराताई व शोभाताई यांचा सन्मान करण्यात आला. मिलिंदजी परांडे यांनी प्रबोधनात हिंदू मंदिरांचे महत्व, मंदिरे समाजप्रबोधनाची केंद्र काशी राहिली आहे, हिंदू पूजापद्धतीमध्ये झालेला बदल हाच हिंदूंच्या संस्कृतीवर घाव घालणारा आहे, इतर धर्मीय कोणत्या पद्धतीने आपल्या समाजाची दिशाभूल करतात, ख्रिश्चन आणि मुस्लिम समाज आंतराष्ट्रीय षड्यंत्रापासून ते आपल्या वस्तीपर्यंत हिंदूंना धर्मांतरित करीत चालला आहे. याविरुद्ध उभे राहायचे असेल तर संपूर्ण हिंदू समाज पूर्ण शक्तीने उभा राहिला तर समाज परिवर्तनाची सर्वात मोठी क्रांती हा भारत घडवेल, असे सांगितले. सदरप्रसंगी अमर सातपुते, धर्मप्रसार परियोजना प्रमुख प्रांत समीर पायगुडे, प्रांत धर्माचार्य संपर्क टोळी सदस्य.उपस्थित होते.

यावेळी देवीची महाआरती आणि महाप्रसादाने सांगता झाली. या मंदिरात मच्छिंद्र महाराज वाळंज व कृष्णल (सोनुगुरु) तागुंदे यांच्यामार्फत समाजप्रबोधन, व हिंदू समाजाच्या अडचणी सोडवण्याचे कार्य सुरू आहे. तसेच भाविकांसाठी अन्नछत्र काळेश्वरी मातेच्या नावाने चालविले जाते.

**चेतनजी शेळके**
**छत्रपती संभाजी महाराज भाग धर्मप्रसार प्रमुख**



## सातवाडी प्रखंडात सायबर सुरक्षा व लव्ह जिहाद समुपदेशन

खोट्या प्रेमाच्या सापळ्यापासून विद्यार्थिनींचे संरक्षण या विषयांतर्गत समुपदेशन तसेच सायबर सुरक्षा विषयी कार्यशाळेचे आयोजन सातवाडी प्रखंडात केले होते. हिमगिरे क्लासेस, ग्रॅव्हिटी क्लासेस या ठिकाणी कार्यशाळेचे आयोजन केले होते.कार्यशाळेमध्ये समुपदेशनासाठी हडपसर जिल्हामंत्री राजेंद्र शेवाळे, दुर्गा वहिनी जिल्हा सहसंयोजिका नम्रता कुलकर्णी, महिला पोलीस अधिकारी विजया घोडके व आश्लेषा माने उपस्थित होते.

तसेच सायबर सुरक्षा म्हणजे आपण इंटरनेट मोबाईल सोशल मीडिया वापरताना आपली माहिती फोटो पासवर्ड आणि ओळख सुरक्षित ठेवणे, अज्ञात लिंक वर क्लिक करू नये. सोशल मीडियावरती ओळख पटल्याशिवाय मैत्री करू नये. वेळोवेळी पासवर्ड बदलत राहावे. काही संशयास्पद वाटल्यास लगेच पालक किंवा शिक्षकांना त्याची माहिती द्यावी. कुठल्याही प्रकारचा त्रास झाल्यास पोलीस स्टेशनचे हेल्पलाइन नंबर देण्यात आले.

सदर कार्यक्रमाचेआयोजन सातवडी प्रखंड मंत्री राहुल मोडक तसेच जिल्हा कार्यकारणी सदस्य श्री. मंगेश कंठाळे, हिम्मत माने तसेच हिंगमिरे क्लासेसचे संचालक आप्पासाहेब हिंगमिरे आणि ग्रॅव्हिटी क्लासेसचे शुभम इंगळे सर यांनी केले होते.

## मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामतर्फे सिन्नर येथे शिबीर

सिन्नर येथे अर्चक व पुरोहितांचे सेवा शिबिर घेण्यात आले. शिबिरात अर्चक व पुरोहितांना अशोका मेडीकेअर हॉस्पिटलतर्फे आरोग्य सुविधा ब्लड प्रेशर, शुगर ,इसीजी चेकअप तसेच डोळे तपासणी, आयुर्वेदिक नाडी चिकित्सा करण्यात आली. व ई श्रम कार्डाबद्दल माहिती दिली. व ७५ रुपये भरून श्रम कार्डासाठी नाव नोंदणी केली. नाव नोंदणीचे काम चंद्रशेखर पाध्ये यांनी केले कार्यक्रमाचे आयोजन मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे प्रांत सहप्रमुख समीर घरोटे ,विश्व हिंदू परिषद नाशिक जिल्हा ग्रामीण अध्यक्ष बाळासाहेब देशपांडे यांनी केले. पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज खेडलेकर प्रमुख पाहुणे होते प्रांत प्रमुख धनाजी शिंदे, पिंपरी चिंचवडचे मनु राजन व भीमाशंकर आयाम सहप्रमुख रवी लोखंडे उपस्थित होते. धनाजी शिंदे यांनी अर्चक व पुरोहितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम संपन्न करण्यासाठी मातृशक्तीच्या संयोजिका माधवी कुलकर्णी, मंदिर अर्चक पुरोहित संपर्क नाशिक जिल्हा प्रमुख प्रशांत कुलकर्णी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. १३० अर्चक, पुरोहित व मंदिर संबंधित लोकांनी सेवा शिबिराचा लाभ घेतला. आतापर्यंत नाशिक शहर आणि नाशिक ग्रामीण मधील सिन्नर प्रखंड यांचे कार्यक्रम झाले.

**श्री धनाजी शिंदे, (मंदिर अर्चक पुरोहित संपर्क प्रमुख, प. महा.)**



विश्व हिंदू परिषद वर्धापन दिनानिमित्त डॉ शरदभाऊ कुंटे यांनी आपल्या निवृत्ती वेतनातून रक्कम रु१.०० लाख इतका धनादेश परिषदेच्या कार्यासाठी निधी म्हणून देणगी स्वरूपात दिला. सदर वेळेस प्रांत मंत्री किशोर चव्हाण ,पर्वती जिल्हा मंत्री नाना क्षीरसागर व सहमंत्री दत्ताभाऊ पोकळे उपस्थित होते.मा.शरदभाऊ यांनी वर्धापनदिना निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. डॉ शरदभाऊ विहिपच्या कार्यात सुमारे १८ वर्षे विविध पदांवर कार्यरत होते.

## ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : EXABX No. ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

* १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
* ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
* ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
* १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
* ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
* शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
* ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

श्री. महेश संभाजीराव करपे
श्री. हेमंत संभाजीराव करंजे
श्री. योगेश दत्तात्रय ससाणे
श्री. अनिल जयवंतराव भुजबळ
श्री. किसन दिनकर शिंदे
श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम
श्री. अनिल लक्ष्मण बधे
श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे
श्री. माधव पांडुरंग राऊत
सौ. लता सतिष केंढे
श्री. हनुमंत बबन शिवले
श्री. भगवान दशरथ मेमाणे

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) नमस्कार. आज नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन आहे. आजचा दिवस हा वैश्विक संस्कृत दिनम् म्हणून साजरा केला जातो. भारत सरकारने १९६९ साली महान व्याकरणकार पाणिनी यांच्या २,५०० व्या जयंती निमित्त हा श्रावण पौर्णिमा दिवस संस्कृत दिवस म्हणून घोषित केला.

या निमित्ताने आपणास एक संस्कृत सुभाषित व त्याचा अर्थ पाठवत आहे. हे सुभाषित सेवाकार्याशी संबंधित आहे. श्री रन्तिदेव हे महान व उदारशील राजा होते. देवांनी प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले. तेंव्हा त्यांनी खालील सुभाषित प्रमाणे वर मागितला. त्यात म्हटल्याप्रमाणे आपणही सर्वांनी कोणत्या ना कोणत्यातरी परीने सेवा कार्यात सहभागी व्हावे.

न त्वहम् कामये राज्यम् न स्वर्गम् न पुनर्भवम्।

कामये दुःखतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम्।।

अर्थ : हे देवा मला न राज्याची अपेक्षा आहे, न स्वर्गाची आसक्ती आहे. तसेच मला मोक्ष किंवा पुनर्जन्माचीही इच्छा नाही. मला फक्त दुःखाने त्रासलेल्या प्राणिमात्राचे पीडानिवारण करावयाला मिळावे.

२) नुकतेच कोषश्री या पोर्टलचा शुभारंभ केंद्रीय शिक्षण मंत्री श्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते झाला. पुण्यातील डेक्कन कॉलेज आणि सीडॅक यांच्या सहकार्याने हे पोर्टल तयार करण्यात आले. कोषश्री हा ऐतिहासिक तत्वावर आधारित संस्कृत शब्दकोश प्रकल्प आहे. याची सुरुवात १९४८ मध्ये झाली. ऋग्वेदापासून १९ व्या शतकातील ग्रंथापर्यंत सुमारे १५०० संस्कृत ग्रंथातील संदर्भ, १ कोटी संदर्भ स्लिप्स, आणि १५ लाख शब्द याचे दस्तऐवजीकरण करून स्क्रिप्टोरिअम मध्ये संग्रह केले. १९७६ पासून आतापर्यंत ३५ खंड प्रकाशित झाले. आता या खंडातील माहिती डिजिटलायझेशन करून वेबसाईटवर उपलब्ध झाली आहे. कोषश्री मध्ये वेद, धर्मशास्त्र, दर्शन, गणित, रसायन वगैरे ६२ पारंपरिक विद्याशाखांचे शब्द आणि संकल्पना समाविष्ट आहेत. या कोषात प्रत्येक शब्दाचा इतिहास, व्युत्पत्ती, अर्थविकास आणि ग्रंथातील संदर्भ दिले आहेत. त्यामुळे हा एक संस्कृत ज्ञानकोश ठरला आहे.

३) एल अँड टी च्या कोइमतूर कारखान्यात तेजस या लढाऊ जेट (LCA Mk1A) विमानाचे पंख बनवून ते हिंदुस्थान एरॉनॉटिक्स कंपनीला विमान निर्मिती साठी नुकतेच दिले. पहिल्यांदाच एका खाजगी कंपनीने पंख बनवून दिले. सध्या कंपनी दरवर्षी पंखांचे ४ सेट पुरवणार असून लवकरच वर्षाला १२ सेट पुरवले जातील. यामुळे हिंदुस्थान एरॉनॉटिक्स ची लढाऊ विमान बनवण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढेल.

४) १४ जुलै रोजी भारताने विष्णु प्रकल्पाअंतर्गत ET-LDHCM (Extended Trajectory Long Duration Hypersonic Missile) ची यशस्वी चाचणी घेतली. या क्षेपणास्त्राने अपेक्षित Mach 8 म्हणजे ११,०००/- किमी प्रति तास हा वेग गाठला. हे क्षेपणास्त्र सर्व गोष्टीत म्हणजे प्रॉपलेशन, गायडन्स, स्ट्रक्चरल मटेरियल, आणि अति उष्ण तापमानात (२,००० सेंटिग्रेड) काम, वगैरे सर्व गोष्टी मध्ये उच्चतम आहे. सध्या ते १,५०० किमी अंतरावरील लक्ष्याचा, शत्रूच्या प्रगत रडारला न सापडता वेध घेते. लवकरच ते पुढचा २५०० किमी पर्यंतचा टप्पा गाठणार आहे. असे तंत्रज्ञान सध्या अमेरिका रशिया व चीनकडे आहे. आणि आता भारत चौथा देश झाला आहे. यामध्ये स्क्रॅमजेट इंजिन वापरले आहे. जे वातावरणातील ऑक्सिजन वापरते. यावर १,००० ते २,००० किलो वजनाचे बॉम्ब किंवा अण्वस्त्रे बसवता येतात. हे क्षेपणास्त्र जमिनीवरुन, समुद्रातील प्लॅटफॉर्म वरुन किंवा सुखोई, राफेल विमानातून डागता येतात. सध्या च्या ब्रम्होस चा वेग Mach-3 (३,७०० किमी प्रति तास) असून टप्पा २९० ते ४०० किमी चा आहे.

५) भारतीय हायड्रोजन ट्रेन – हायड्रोजन पॉवर ट्रेन ला वीज किंवा डिझेल लागत नाही. त्यामुळे ती प्रदूषण मुक्त असते.

तसेच जिथे वीजपुरवठा देणे शक्य नाही, अशा ठिकाणीही ती जाऊ शकते. डिसेंबर २१ मध्ये Research Designs and Standards Organisation ने हायड्रोजन सेल वरती चालणाऱ्या रेल्वे ची डिझाईन स्पेसिफिकेशन फायनल केली. त्यानंतर चेन्नई येथील इंटिग्रल कोच फॅक्टरी चे डिझाईन, व उत्पादन काम सुरू झाले. त्यात रेल्वे डब्याबरोबर हायड्रोजन सिलिंडर, फ्युएल सेल कन्व्हर्टर, बॅटरी वगैरे गोष्टींचे डिझाईन व उत्पादनाचे काम सुरू झाले. भारताने १,२०० हॉर्स पॉवर इंजिन (जगातील काही देशात सध्या जास्तीत जास्त ५०० ते ६०० हॉर्स पॉवर इंजिन वापरले जाते.), आणि आठ डब्यातून एका वेळी २,६३८ प्रवासी वाहतूक, ती ही ११० किमी प्रति तास वेगाने करण्याचे नियोजन केले.

२०२३ मध्ये राज्यसभेत रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की ३५ हायड्रोजन ट्रेन बनवल्या जात आहेत. ऑक्टोबर २०२१ मध्ये रेल्वे ने सध्याचे डिझेल-इलेक्ट्रिक इंजिन हे हायड्रोजन पॉवर इंजिन मध्ये बदलण्याचे टेंडर काढले. सप्टेंबर २०२२ मध्ये मेधा सर्व्हो ड्राईव्ह कंपनी ला ८ डिझेल-इलेक्ट्रिक इंजिन ची हायड्रोजन इंजिन मध्ये रुपांतर करण्याची ऑर्डर दिली.

२०२३-२४ च्या अर्थसंकल्पात रुपये २,८०० कोटींची तरतूद हायड्रोजन पॉवर ट्रेन बनवण्यासाठी केली.

ऑक्टोबर २०२४ मध्ये 1 MW PEM Electrolyser हरयाणातील जिंद स्टेशन वर उभारण्यास सुरुवात झाली. तेथे रोज ४० बार प्रेशरचा ४३० किलो हायड्रोजन बनवला जातो. तसेच ३,००० किलो हायड्रोजन साठवता येतो.

एप्रिल २०२५ मध्ये हायड्रोजन ट्रेन ची ट्रायल हरयाणातील जिंद ते सोनिपत या ८९ किमी मार्गावर सुरू झाली. आणि आता लवकरच कलका - सिमला मार्गावर पहिली हायड्रोजन रेल्वे धावू लागेल.

६) भारत आणि अमेरिकेने म्हणजेच इस्रो व नासाने संयुक्तपणे विकसित केलेल्या नासा-इस्त्रो सिंथेटिक रडार (निसार) या अत्याधुनिक उपग्रहाचे, बुधवारी ३० जुलै रोजी, श्रीहरिकोटा येथून भूस्थिर प्रक्षेपकाने (जीएस् एल् व्ही एफ् १६) यशस्वी प्रक्षेपण झाले. या प्रक्षेपकात अमेरिकेने भारताला न दिलेले व नंतर भारताने स्वतः विकसित केलेले क्रायजेनिक इंजिन वापरले होते. प्रक्षेपकाने निसार उपग्रह तीन किलोमीटरच्या असामान्य अचूकतेने ७४७ किमी च्या कक्षेत प्रस्थापित केला. प्रक्षेपणाला उपस्थित राहिलेल्या अमेरिकेतील शास्त्रज्ञांनीही या अचुकतेचे कौतुक केले. या उपग्रहात अमेरिकेचा ११,००० कोटींचा सहभाग आहे. निसार ही पृथ्वी निरीक्षणाची अत्याधुनिक वेधशाळा असून त्यातील एस् बँड रडार, इस्त्रोने तर एल् बँड रडार नासाने विकसित केलेला आहे. दोन बॅन्ड असणारा जगातील हा पहिलाच उपग्रह. पृथ्वीच्या प्रत्येक भागाचे दर १२ दिवसांनी मायक्रोवेव्हच्या साह्याने ५ ते १०० मीटर च्या रिझोल्यूशन ने २४० किलोमीटर रुंदीच्या पट्ट्याचे चित्रिकरण होत राहणार आहे. हवामान बदलाचे परिणाम, ज्वालामुखी, भूकंप या मुळे भूरचनेत होणारे बदल वगैरेच्या अभ्यासासाठी तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी या नोंदीचा वापर केला जाईल. भारताच्या दृष्टिकोनाप्रमाणे या नोंदणी जगभरातील शास्त्रज्ञासाठी मोफत खुल्या राहतील.

७) जागतिक अंधत्व विरोधातील लढाईत भारतीय ऑरोलॅब कंपनी : गरीब देशातील सर्वसामान्य लोकांना परवडतील अशी उच्च दर्जाची नेत्र उत्पादने, विशेषतः इंट्राओक्युलर लेन्स (आय् ओएल्) तयार करण्याच्या उदात्त ध्येयाने, १९९२ मध्ये मदुराई येथे ही कंपनी सुरु झाली. अरविंद आय् रुग्णालयाचे संस्थापक डॉ. जी वेंकट स्वामी यांनी ही कंपनी सुरु केली. मोतीबिंदूच्या ऑपरेशन नंतर लागणाऱ्या या आयओएल लेन्स मल्टिनॅशनल कंपन्या १०० डॉलर ला देत असत, ज्या सर्व सामान्य लोकांच्या आवाक्या बाहेर होत्या. त्या लेन्स ऑरोलॅब ने फक्त १० डॉलर ला देऊ केल्या. आणि काही कालावधीनंतर ३ डॉलर मध्ये उपलब्ध केल्या. भारतात मोतीबिंदू शस्त्रक्रियेत क्रांती झाली. आणि वर्षाला जिथे १० लाख शस्त्रक्रिया व्हायच्या, तिथे ७० लाख शस्त्रक्रिया होऊ लागल्या. ही कंपनी आय् ओएल् सोबत अन्य उपकरणे, जसे सुया, दोरे, सर्जिकल ब्लेड, आय ड्रॉप्स वगैरे नेत्र शस्त्रक्रिया व उपचार साठी लागणारी उत्पादनेही बनवत आहे. जवळपास १६० देशांमध्ये ही उत्पादने निर्यात केली जातात. सध्या जगात कोठे ना कोठे तरी दर नऊ सेकंदाला एक आय् ओएल् चे रोपण केले जाते. आतापर्यंत तीन कोटींपेक्षा जास्त आय् ओएल् बसवल्या गेल्या आहेत.

**कुमार आठवले**

◈ ◈ ◈

# ज्येष्ठा गौरीपूजन - सण समृद्ध मराठी परंपरेचा!

श्रावणाच्या सरी आणि महादेवाची भक्ती यांचा अनुभव घेता घेता मराठी माणसाच्या मनात आस लागते ती गौरी गणपतीच्या आगमनाची ! ह्या सणाची खासीयत म्हणजे हा सण आहे भारतीय हिंदू संस्कृती बरोबर महाराष्ट्रीय उत्सव व परंपरेची समृद्धी वृद्धिंगत करणारा ! भाद्रपद महिन्यात जशी कृष्ण जन्माष्टमी व गणेशोत्सव मोठ्या थाटात साजरा केले जातात तसेच गौरी पूजन हा सण म्हणजे मराठी कुटुंबियांच्या संस्कृतीचा वारसा जणू ! संपूर्ण महाराष्ट्रभर हा सण विविध धार्मिक पध्दतीने साजरा करतात. सण जरी सारखाच असला तरीही भागापरत्वे त्याची नावेही वेगळी प्रचलित आहेत. जसे कोकणात गौरी पूजन, पश्चिम महाराष्ट्रात जेष्ठा गौरी पूजन तर विदर्भ मराठवाड्यात महालक्ष्मीचा सण असे म्हणतात.

ह्या सणाची पौराणिक आख्यायिका अशी की वर्षोनुपूर्वी कोलासुर नावाचा एक राक्षस स्त्रियांना फार त्रास देत होता. त्याच्या त्रासाला कंटाळून स्त्रिया एकत्र झाल्या व त्यांनी ब्रह्मा, विष्णू, आणि महेश यांना प्रार्थना केली. त्यांनी या तीनही देवांना आपल्यावर आलेल्या संकटाची जाणीव करून दिली. त्यांचे संकट पाहून देवांनी हे काम विष्णूंची पत्नी महालक्ष्मी हिच्याकडे सोपविले. तेव्हा महालक्ष्मी हिने कोलासुराशी युद्ध केले व त्याचा नाश केला. महालक्ष्मी हिच्या कृपेने स्त्रिया संकटमुक्त होऊन त्यांना सौभाग्य लाभले, त्या सुखी झाल्या. तेव्हापासून महालक्ष्मी हा सण साजरा केला जातो. हिंदू देवता शास्त्रात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप आहे अग्निपुराणामध्ये गौरी मूर्तीच्या पूजनाचा उल्लेख आहे. ह्याच सणात गौरी आईची आणि गणपतीची ही भेट होते म्हणूनच याला गौरी गणपतीचा सण असेही म्हटले जाते.

भाद्रपदात आगमन होणाऱ्या गौरींचे विविध भागात वेगवेगळ्या पद्धतीने पूजन केले जाते.

१) महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भात गौरी ची परंपरा फार आत्मीयतेने जपली जाते व मोठ्या उत्सवात ती साजरी केली जाते. जेष्ठा व कनिष्ठा गौरींचे मुखवटे हे पितळी किंवा मातीचे असतात तर दोन्ही गौरींला काही ठिकाणी हंड्यांची उतरंडी करून किंवा कुणाकडे पत्र्यांच्या कोठ्यांमध्ये धान्य भरून त्यांना साडी चोळी नेसवली जाते. काही ठिकाणी जमिनीवर गहू किंवा तांदूळ यांच्या राशी घालून किंवा काही घरी सुपात धान्याची रास घालून त्यावर गौरीचे मुखवटे मांडले जातात. काही कुटुंबांमध्ये या गौरींच्या बाळांचे (एक मुलगा व एक मुलगी) यांचे देखील पूजन केले जाते. आणि ह्या गौरींना महालक्ष्मी असे संबोधले जाते. सहसा पंचागात मुहूर्त पाहून ह्या महालक्ष्मींचे आगमन सायंकाळी केले जाते.

२) पश्चिम महाराष्ट्र किंवा कर्नाटक सीमेवरील काही घरांमध्ये ह्या जेष्ठा गौरीचे आगमन हे श्रावण महिन्याच्या पहिल्या शुक्रवारीच होते. ह्या भागातल्या गौरींचे रूप वेगळे असते ह्या तांब्यांच्या असतात आणि त्यावर काही विशेष पौराणिक चित्र तसेच लहान तांब्यावर गौरीचा मुखवटा रंगवलेला असतो. जिवतीच्या पूजेबरोबर ह्या गौरीचे पूजन करून भाद्रपद महिन्याच्या गौरी आवाहनाच्या दिवशी जेष्ठा गौरीसोबत कनिष्ठा गौरीचे आगमन करून पूजन केले जाते. तसेच नदीकाठी जाऊन नदीतले खडे व तेरड्याची रोपे मुळासहित आणून तिचे देखील लक्ष्मीमाता म्हणून तीन दिवस पूजन केले जाते. ह्या गौरींचे सहसा सकाळच्या वेळेस आगमन होते.

३) दक्षिण भारत– इथे भाद्रपद शुक्ल तृतीयेला गौरीचा सण सुरू होतो व तो बरेच दिवस चालतो. प्रत्येक गावात गौरीची एक पिठाची प्रतिमा करतात व तिला मखरात बसवून पूजतात. तिची रस्त्यातून मिरवणूकही काढतात.

४) कोकण – कोकणात प्रसिद्ध असलेल्या गौरी म्हणजे खड्याच्या गौरीनदीकाठी जाऊन तेथील कुटुंबाच्या परंपरेनुसार सात/अकरा असे काही खडे ताम्हणात वाजतगाजत घरी आणून त्यांना तांदळाच्या राशीवर मांडले जाते व गौरी म्हणून पूजले जाते. तसेच महाराष्ट्रातील कोकण प्रांतातील कोळी समाजगटातील महिला या दिवशी तेरड्याची फांदी आणून तिला लक्ष्मीस्वरूप

मानून तिची पूजा करतात. तर काही घाटमाथ्यावरील लोक केळीच्या पानावर देवीची डोळे, नाक, तोंड असे चित्रातून लक्ष्मीमातेस पूजतात.

गौरी पूजनाची माहिती –गौरी आवाहनावेळी आपापल्या परंपरेप्रमाणे घराच्या उंबऱ्यातून आत आणताना, जिच्या हातात गौरी असतील त्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुतात आणि त्यांवर कुंकवाचे स्वस्तिक काढतात. घराच्या दरवाज्यापासून ते जिथे गौरी बसवायच्या त्या जागेपर्यंत तसेच घरभर हळदी कुंकवाने लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे घरात आणतात. त्यावेळी ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे आगमन होते. यानंतर त्यांची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील देव व गणेशाची भेट घडवली जाते. तसेच घरातील समृद्धी, दुध–दुभत्याची जागा इ. गोष्टी दाखविण्याची प्रथा आहे. तेथे त्यांचे आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो अशी प्रार्थना करतात.काही ठिकाणी लोक तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवितात व तिच्यावर मातीचा मुखवटा चढवितात.नंतर त्या मूर्तीला साडी नेसवून दागदागिन्यांनी सजवितात.

गौरी/ महालक्ष्मी या सणाला जितके धार्मिक महत्त्व आहे तितकेच विविध भागानुसार तीनही दिवस वेगवेगळ्या पदार्थांचे नैवेद्य दाखविले जातात. त्यामुळे या सणाच्या निमित्ताने जणू महाराष्ट्रीय खाद्य संस्कृतीचेही दर्शन घडते. तसेच या सणाचे औचित्य साधून काही कुटुंबांमध्ये उच्च वर्णीय महिला सवाष्ण म्हणून जेवायला आमंत्रित करताना इतरेतर समाजातील महिलेला देखील आवर्जून जेवणासाठी आमंत्रित करतात. यातून हे स्पष्ठ होते की,आपली हिंदू परंपरा ह्या रूढीं बरोबर सामाजिक बांधीलकी सुद्धा जपत असतात.

१) पहिल्या दिवशी आलेल्या या माहेरवाशीन गौरीला भाजी–भाकरीचा नैवैद्य दाखवण्याची पद्धत काही भागात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात आहे. या प्रथेला गौरी आवाहन करणे असे संबोधतात.

२) दुसऱ्या दिवशी म्हणजेच ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींची पूजा होते. सकाळी गौरींची/महालक्ष्मीची पूजा–आरती करून केलेल्या फराळाचा (रव्याचा लाडू, बेसनलाडू, करंजी, चकली, शेव, गुळपापडीचा लाडू) नैवेद्य दाखवतात. नंतर संध्याकाळी महानैवैद्य व महाआरती केली जाते. नैवेद्यात संपूर्ण पुरणवरणाचा स्वैयंपाक, (खास करून विदर्भात) ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ, मसालेभात वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, इत्यादी. केलेले सर्व पदार्थ केळीच्या पानावर वाढले जातात. ज्यांचे कडे सकाळी महाआरती होते त्यांचेकडे याच सायंकाळी महिलांचा हळदीकुं कवाचा कार्यक्रम केला जातो.

३) तिसऱ्या दिवशी म्हणजेच मूळ नक्षत्रावर गौरींचे/महालक्ष्मींचे विसर्जन करतात. त्या दिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. ह्या सणातला हा एक अजून महत्वाचा मानला जाणारा भाग म्हणजे दोरकाची पूजा! या तिसऱ्या दिवशी गौरींच्या पूजेबरोबरच सुताच्या गुंड्याला सोळा गाठी देऊन त्याचीही पूजा करतात. तो गुंडा पहिल्याच दिवशी हळदीने रंगवून गौरी समोर ठेवला जातो. त्यातला दोरा घरातल्या सुवासिनी आपल्या गळ्यात घालतात व आश्विन वद्य अष्टमीला तो गळ्यातून काढून त्याची पूजा करतात. या दोऱ्यालाच महालक्ष्मी समजतात. सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. नंतर गौरींची/ महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड व मुरड कानुले याचा नैवेद्य दाखवतात. व गौरींचे विसर्जन करून धातूच्या गौरींच्या राशीतील धान्य लगेच शिजवून जेवणात वापरले जाते तर तेरड्याच्या गौरीचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे.

गौरी/ महालक्ष्मीच्या पूजेमुळे आपल्याला विविध प्रकारात हिंदू संस्कृती, रूढी व परंपरा यांचे प्रकार, वैविध्यपूर्ण खाद्यसंस्कृती, सामाजिक बांधिलकी व आपुलकी बघायला मिळते.भारत एक सर्जनशील राष्ट्र असून महाराष्ट्रातील हा सण आपल्याला त्याची नव्याने जाणीव करून देतो. महालक्ष्मी ही संपत्तीची, समृद्धीची आणि सुबत्तेची देवी मानली जाते. त्यामुळे, या सणाच्या पूजेमुळे घरात धन–धान्याची वाढ होते, अशी मान्यता आहे. त्यामुळे तेरड्याची रोप किंवा धान्यांच्या राशीत देवी म्हणून पूजन करून कृषिप्रधान संस्कृती जपली जाते. तसेच या काळात होणाऱ्या किरकोळ खरेदी विक्रीमुळे आर्थिक दृष्ट्या देखील बरीच उलाढाल होते. महालक्ष्मीच्या पूजेमुळे घरात कुटुंबातील सदस्य व सगेसोयरे एकत्र येतात त्यामुळे सामाजिक संबंध दृढ होऊन सुख–शांती आणि समृद्धी नांदते आणि कुटुंबसंस्था मजबूत होण्यास मदत होते. असा हा समृद्धीचा सण तुम्हा–आम्हा सर्वांना समृध्द व संपन्न करो हिच सदिच्छा!

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈

# सज्जनगड

आज एक वेगळीच कथा आपल्याला सांगणार आहे. आपल्यापैकी बऱ्याच जणांनी सज्जनगड पाहिला असेल. गडावर असलेले समर्थांचे समाधी मंदीर सुद्धा पाहिले असेल आणि त्यांचा राहता वाडा किंवा मठ तो देखील पाहिला असेल.

छत्रपती संभाजी महाराजांनी केवळ पावणे दोन महिन्यांमध्ये बांधलेल्या ह्या मंदिरामध्येच वरच्या बाजूला प्रभू रामचंद्रांच्या मूर्ती आहेत, परंतु हे मंदिर ही गडावरची सगळ्यात जुनी वास्तू नाही. तर शिवछत्रपतींनी स्वतःच्या निवासासाठी बांधलेला वाडा ही गडावरची सर्वात जुनी वास्तू आहे.

समर्थांनी आपल्या आयुष्यातला अखेरचा महत्त्वाचा काळ सज्जनगडावरती व्यतीत केला आणि तशी त्यांना शिवछत्रपतिनीच विनंती केली होती हे आपण जाणतो. परंतु आपल्या राहत्या वाड्यामध्ये समर्थांना मुक्कामास ठेवून घेतलेल्या शिवछत्रपतींनी गडावरती आल्यावर जेव्हा वाड्याशेजारी असलेला मोठा खड्डा पाहिला, तेव्हा त्यांनी तो खड्डा बुजवून टाकण्याची आज्ञा मावळ्यांना दिली. त्यावर श्री समर्थांनी शिवरायांना विनंती केली की कृपया तो खड्डा बुजवू नये कारण पुढे त्याचा मोठा उपयोग व्हावयाचा आहे.

समर्थांनी संपूर्ण भारतभरात मठस्थापना केली हे तर आपण जाणतोच त्यातील बरेचसे मठ आजच्या तमिळनाडू राज्यामध्ये आहेत. तमिळनाडूमध्ये अरणी नावाचे एक गाव आहे. येथील हातमागावर विणलेल्या आणि अक्षरशः काडीपेटी मध्ये बसेल इतकी छोटी घडी होणाऱ्या आरणीच्या रेशमी साड्या माता–भगिनींना सुपरिचित असतीलच. तेच हे अरणी गांव जिथे समर्थांचे नेहमी येणे जाणे असे. हे ठिकाण तंजावर पासून तसे जवळ आहे. तंजावर मध्ये समर्थांचे आजही सात मठ कार्यरत आहेत, असो.

तर या अरणी गावांमध्ये पितळयापासून किंवा पंचधातूपासून देवदेवतांच्या अत्यंत सुंदर मूर्ती घडविणारे अनेक कारागीर परंपरागत राहत आहेत. आजही आहेत.

गुणग्राहकतेचा सदैव ध्यास असलेल्या समर्थांना निश्चितच असे वेड लागले की या सर्व मूर्तीकारांमध्ये सर्वात उत्कृष्ट कला अंगी असलेला मनुष्य कोण असेल ? तेव्हा त्यांना असे कळले की असा एक वृद्ध कारागीर तिथे आहे परंतु मूर्ती करताना उडणारे धातूचे कण डोळ्यामध्ये गेल्यामुळे त्याची दृष्टी अधू झालेली आहे त्याला अजिबात दिसत नाही त्यामुळे आता त्याने मूर्तिकला थांबविली आहे.

समर्थांना खूप वाईट वाटले आणि त्या वृद्ध कारागिराने आयुष्यभर केलेल्या परमेश्वराच्या सेवेचे फळ म्हणून की काय साक्षात समर्थ त्यांच्या दारात जाऊन हजर राहिले. समर्थ त्या कारागिराला म्हणाले की मला माझ्या नित्य पूजेसाठी रामाचे पंचायतन बनवून हवे आहे आणि ते तुमच्या हातूनच बनविले पाहिजे असा माझा अट्टाहास आहे. वृद्ध कारागीर रडू लागला. त्याने समर्थांना सांगितले की हे साधू मला आता दृष्टी उरलेली नाही त्यामुळे आपली ही इच्छा पूर्ण होण्याची शक्यता नाही. यावर समर्थांनी त्या कारागिराला जे उत्तर दिले ते अक्षरशः हृदयात कोरून ठेवण्या सारखे आहे.

समर्थ त्याला म्हणाले, अरे बाबा माझ्या प्रभूरामचंद्राचे दर्शन घेण्यासाठी या चर्मचक्षूंची अजिबात आवश्यकता नाही. तो आत्माराम तर तुझ्या माझ्या अंतरंगात वास करतो आहे. त्याचे दर्शन आपल्याला आपल्या अंत:चक्षूंनी सुद्धा होऊ शकते आणि बहुतेक रामरायाची अशी इच्छा दिसते की तुझ्या हातूनच पुन्हा प्रकट व्हावे त्यामुळे तुच त्या मूर्ती घडविणार आहेस. असे म्हणत समर्थांनी त्या कारागिराच्या डोक्यावरती हात ठेवला आणि पाहता पाहता त्याचे देहभान हरपले त्याच्यासमोर तेजाचा एक मोठा झोत दिसू लागला ! पाहता पाहता त्या तेजाच्या गोळ्याचे रूपांतरण प्रभू रामचंद्रांच्या अत्यंत सुंदर मनोहरी अशा मूर्ती मध्ये झाले ! साक्षात प्रभू रामचंद्रांनी त्या कारागिराला दर्शन दिले ! तो अक्षरशः कृतकृत्य झाला !

समर्थांच्या भेटीने त्याला दिव्य दृष्टी प्राप्त झाली आणि त्याने विनाविलंब अत्यंत सुंदर अशा प्रभू रामचंद्र, श्री सीतामाई, श्री लक्ष्मण आणि समोर उभा ठाकलेला दासमारुती, अशा अप्रतिम मूर्ती हातोहात घडविल्या. त्या मूर्ती पाहून समर्थ अत्यंत प्रसन्न झाले आणि त्यांनी त्या कारागिराला विचारले की तुला काय हवे ते माग, त्यावर आरणीकर त्यांना म्हणाला समर्थ आपले दर्शन जाहले, साक्षात प्रभू रामचंद्रांचे दर्शन झाले ! या डोळ्यांनी आता अन्य काही पहायची इच्छा उरलेलीच नाही. त्यामुळे माझी दृष्टी पूर्ववत आंधळी करून टाकावी इतकीच आपल्याला प्रार्थना आहे, म्हणजे सतत त्या आत्मारामाच्या चिंतनात उरलेला काळ व्यतीत करता येईल ! समर्थांनी त्याची दृष्टी काही घालविली नाही परंतु सतत त्या आत्मारामाचे दर्शन घडेल अशी आत्मदृष्टी त्याला देऊ केली. अनुग्रह देऊ केला. आणि भरभरून आशीर्वाद दिले.

समर्थ गडावरती आले. त्या मूर्ती आज आपण ज्याला समर्थांचे शेजघर म्हणतो त्याचे घरामध्ये १४ दिवस त्यांनी पुजल्या. आजही त्या खोलीमध्ये राममूर्तींचा ओटा म्हणून चंदनाची अत्यंत सुबक कलाकुसर असलेला एक लाकडी ओटा ठेवलेला आहे पहा त्यावर त्या मूर्ती ठेवलेल्या होत्या. पंधराव्या दिवशी समर्थ आपल्या आसनावरून खाली जमिनीवरती येऊन बसले, पद्मासन लावले, दृष्टी नासाग्री स्थिर झाली, डोळे मिटले. त्रिवार रामरायाचा जयजयकार केला आणि त्यांच्या देहातून प्राणज्योतीचा मोठा लोळ बाहेर पडून तो थेट त्या रामाच्या मूर्तींमध्ये प्रवेश करता झाला हे सर्व उपस्थित शिष्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. तो दिवस होता माघ वद्य नवमीचा.

ही बातमी छत्रपती संभाजी महाराजांना कळताच ते जातीने सज्ज्नगडावरती उपस्थित झाले आणि मठाच्या शेजारी जो मोठा खड्डा होता तिथेच समर्थांच्या पार्थिवाचे दहन करण्यात आले. दुसर्या दिवशी त्या चितेच्या स्थानी एक स्वयंभू समाधी प्रकट झाली. त्याच समाधीवरती पावणेदोन महिन्यांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी अत्यंत सुबक असे समाधी मंदिर बांधले व समाधीच्या बरोबर वरच्या बाजूला प्रभुरामचंद्रांच्या ह्याच मूर्तींची स्थापना करण्यात आली. स्वतः समर्थांचे प्राण या मूर्तीमध्ये प्रविष्ट झालेले असल्यामुळे त्या मूर्तींची वेगळी प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली नाही. असे कदाचित भारतातील हे एकमेव मंदिर असावे. त्यामुळेच ह्या मूर्ती वर्षातून पाच वेळा जागेवरून हलविल्या जातात व बाहेर अंगणामध्ये आणून स्वच्छ धुतल्या जातात, जी सेवा कोणालाही मिळू शकते. या विधीला उद्वार्चन असे म्हणतात.

आपण ह्या मूर्तीचे नीट निरीक्षण केले असता आपल्याला असे लक्षात येईल की आरणीकराने रामरायाला डोळे तेवढे काढलेले नाहीत. एका अंध कारागिराने केलेल्या मूर्तीची ओळख म्हणून आजही ती कायम राहिलेली आहे ! प्रभू रामचंद्राच्या या मूर्तीचे जर आपण निरीक्षण करत राहिलो तर तासनतास त्या मूर्तीकडे पहातच रहावेसे वाटते इतकी ती सुंदर आहे कारण ती साक्षात प्रभू रामचंद्राला समोर उभे करून बनविण्यात आलेली आहे ! अशा या सुंदर मूर्तीचे दर्शन आपण पूर्वी घेतले असेल तर आपण भाग्यवान आहातच परंतु जर अजून घेतले नसेल तर एकवार अवश्य सज्जनगडावर जाऊन ह्या मूर्तीचे अवलोकन करावे आणि या आयुष्यामध्ये धन्यता कशाला म्हणतात त्याचा अनुभव घ्यावा ! वरील माहिती आपल्याला नवीनच कळली असेल तर ती आपल्या आप्तेष्टांना देखील कळावी म्हणून म्हणून पुढे पाठवावयास काहीही हरकत नाही.

श्री समर्थांचे अवघे वांङ्मय जगभरातून कुठूनही वाचता यावे यासाठी निर्माण केलेल्या खालील संकेतस्थळाचा प्रचार–प्रसार आपले धर्म कर्तव्य समजून अवश्य करावा ही आपल्या चरणी नम्र प्रार्थना.

! जय जय रघुवीर समर्थ !

**मोह सोडता आला तर गमावण्याची भीतीचं राहत नाही, मग ती दौलत असो, पद असो, प्रतिष्ठा असो, वस्तू असो, व्यक्ती असो, नातं असो की अगदी जीवन असो.**

# स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र
# भाग - २

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या दूरदृष्टीतून विकसित केलेल्या एका महत्वाकांक्षी प्रकल्पातून भारताने जगाला आपल्या सामर्थ्याची झलक दाखवून दिली. पृथ्वी, आकाश, त्रिशूल, नाग आणि अग्नि ह्या पाच आंतर्राष्ट्रीय महत्वाच्या क्षेपणास्त्रांचा विकास एकात्मिक निर्देशित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम अर्थात IGMDP (Integrated Guided Missile Development Program) या अंतर्गत केला. पृथ्वी क्षेपणास्त्र हे पहिले जमिनीवरून जमिनीवर (SSM) मारा करणारे १०० कि.मी. पल्ला असणारे क्षेपणास्त्र जे जमिनीवरून अथवा जहाजातून डागता येते. आकाश हे दुसरे जमिनीवरून हवेमध्ये (SAM) मारा करणारे ३० किमी पल्ला असणारे क्षेपणास्त्र, तर त्रिशूल हे तिसरे जमिनीवरून हवेमध्ये (SAM) मारा करणारे केवळ ९ कि.मी. पल्ला असणारे क्षेपणास्त्र. नाग हे चौथे क्षेपणास्त्र रणगाडा विरोधी (Anti Tank Guided Missile ATGM) आठ कि.मी. पल्ला असणारे क्षेपणास्त्र. सर्वात महत्वाचे म्हणजे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे पाचवे क्षेपणास्त्र अग्नि याचा पल्ला १००० कि.मी. आहे. आता प्रत्येक क्षेपणास्त्र हे वाढता पल्ला, वाढती अचूकता व सातत्यता, कमीत कमी किंमत, असे सर्व टप्प्या टप्प्याने अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करून त्याच्या शृंखला मधे विकसित केले आहेत. उदा. पृथ्वी–१, पृथ्वी–२, पृथ्वी–३ किंवा अग्नी–१, अग्नी–२, अग्नी–३, अग्नी–४, ICBM अग्नी–५ वगैरे. ही सर्व क्षेपणास्त्रे त्याच्या विविध प्रकारां (Variants) सह भारतीय सशस्त्र दलांच्या सेवेत रुजू आहेत व त्याची स्वदेशी निर्मितीही चालू असून सेनांना पुरवठा सुरू आहे.

- **क्षेपणास्त्र म्हणजे काय ?**

क्षेपणास्त्र म्हणजे असे शस्त्र की हवेमध्ये प्रवास करतानाही त्याला सतत उर्जा पुरविली जाते व ज्याला योग्य दिशा देण्याची यंत्रणा शेवटपर्यंत म्हणजेच लांचरपासून लक्ष्य गाठेपर्यंत कार्यरत असते. त्यामुळे अचुक लक्ष्यभेद शक्य असतो. २०१४ मध्ये भारतीय वायु सेनेच्या सेवेमध्ये रुजू केलेले आकाश या क्षेपणास्त्राच्या उत्पादन जथ्यामधील सहजगत्या निवडलेल्या दोन क्षेपणास्त्रांची यशस्वी फायर चाचणी बालासोर येथे केली. यावेळी लक्ष्य या मनुष्यरहित विमानाने ओढत नेलेल्या शीघ्र गतिने पुढे येणा–या व मागे जाणाऱ्या टारगेट चा अचूक वेध घेतला. यावेळी आकाश क्षेपणास्त्र प्रणाली आणि टारगेट प्रणाली याचा वापर संपूर्णपणे भारतीय वायुदलाच्याच सदस्यांनी व जवानांनी केला. आणि त्यायोगे या आकाश क्षेपणास्त्रांच्या सर्वच क्षमतांची चाचणी यशस्वी झाली. यासाठी वायुदलाच्या दोन वाहिन्या (Squadrons) तैनात केल्या होत्या, की ज्या वाहिन्यांमध्ये आकाश क्षेपणास्त्रे संमिलित केली आहेत.

आकाश क्षेपणास्त्र असणारी तुकडी (Battery) ही चार स्वयंचलित वाहनांची असते. हे वाहन चाकांचे (Wheeled Vehicle) किंवा लोखंडी पट्ट्यांच्या चाकाचे (Tracked Vehicle) वाहन की ज्यावर तीन आकाश क्षेपणास्त्रे बसविलेली असतात. त्याचबरोबर एक राजेन्द्र नावाचे स्वदेशी तंत्रज्ञानाने बनविलेले BLR (Battery Level Radar) आणि एक नियंत्रण कक्ष (कमांडपोस्ट) (Battery Control Centre) वायुदलाच्या एका वाहिनीमध्ये (Squadron) दोन तुकडयांचा (Battery) समावेश केलेला असतो. त्याच बरोबर एक समूह नियंत्रण कक्ष (Group Control Centre AGCC) याची भर पडते व ते सर्वांना आदेश व नियंत्रण मुख्यालय (Command and Control HQrs) प्रमाणे कार्य करते. अशाच चार छोटया तुकडयांचा सैन्यदलामध्ये समूह (Group) त्याला आकाश समूह याप्रमाणे रचना केली आहे. अर्थातच ही प्रणाली वायूदलाप्रमाणे सैन्यातही (स्थल सेना) २००९ पासून सेवेत आहे. आकाश प्रणाली ही रेल्वे, रस्ते अथवा हवेतून (विमानाद्वारे) तैनात केली जाते.

आकाश क्षेपणास्त्र हे फिरते जमिनीवरून हवेमध्ये मारा करणारे, संपूर्णपणे भारतीय तंत्रज्ञानाने बनविलेले, DRDO ने त्याचे अभिकल्पन व विकास केला असून आयुध निर्माणी, भारत डायनॅमिक्स आणि भारत इलेक्टॉनिक्स यांनी आतापर्यंत एकूण १५५०० आकाश क्षेपणास्त्रे निर्माण केली आहेत. एका क्षेपणास्त्राची किंमत तुलनात्मक पाहिली तर आकाश पेक्षा ८-१० पट महाग असे पाश्चिमात्य समकक्ष क्षेपणास्त्र MIM104 पेट्रीयट (Patriot) आहे. एका पाश्चिमात्य क्षेपणास्त्राची किंमत ५ ते ६ कोटि रूपये आहे. भारताच्या वायुदल व सैन्यदलाने मिळून २३६०० कोटी रुपयांची आकाश क्षेपणास्त्र प्रणाली निर्माण करून त्याचा पुरवठा करण्याचा कार्यादेश दिला आहे.

आकाश क्षेपणास्त्र ही फिरती (Mobile), अनेक दिशांनी येणाऱ्या अनेक लक्ष्यांपासून संरक्षण करणारी एकाचवेळी अनेक लक्ष्यवेध व लक्ष्यभेद करणारी स्वयंचलित प्रणाली आहे. स्वयंचलित हवाई सुरक्षा प्रणाली ची कार्ये

१. आज्ञांकित पाळत ठेवणे (Programmable Surveillance)

२. लक्ष्य शोधणे (Target detection)

३. लक्ष्य संपादन करणे (Target acquisition)

४. लक्ष्याचा सतत माग काढणे (Target tracking)

५. लक्ष्याची ओळख पटवणे (Target Identification)

६. धोक्याचे मूल्यांकन करणे (Threat evaluation)




७. धोक्याचा अग्रक्रम निश्चित करणे (Prioritization)

८. क्षेपणास्त्रास लक्ष्य नेमून देणे (Assignment)

९. लक्ष्य भेद करणे (Engagement)

वरील सर्वकार्ये स्वयंचलित पध्दतीने करून येणाऱ्या शत्रुच्या फायटर किंवा बॉम्बर विमाने, हेलिकॉप्टर, ड्रोन, UAV... अति उंचीवरील हेरगिरी व टेहळणी करणारी विमाने किंवा कमीउंचीवरील क्षेपणास्त्रे (Cruise Missiles) या प्रकारच्या शत्रुच्या लक्ष्यांचा भेद करण्यासाठी सगळी एकत्रित यंत्रणा एकात्मिक पध्दतीने कार्यरत असावी लागते. या सर्व यंत्रणेमध्ये सर्व रडार (BLR,GCC, 3D Central acquisition Radar (3DA CAR)) कमांड कंट्रोल सेंटर्स, सर्व क्षेपणास्त्र प्रक्षेपक यांचा योग्य समन्वय करून योग्य वेळी योग्य क्रिया कराव्या लागतात. त्या सर्वांच्या योग्य समन्वयाने सर्व क्रिया सुरळीत पार पाडल्या जातात. सर्व सेफ्टी इंटरलॉक्स योग्य वेळी खुले करून क्षेपणास्त्र झेपावते व लक्ष्याचा भेद करते यासाठी योग्य संचार जाल (Communication Network), आकाश मधे प्रगत ECCM² (Electronics Communication Counter Measure) हे फीचर्स वेगवेगळ्या स्तरावर दिलेले आहेत.

आकाश क्षेपणास्त्र प्रणाली चे वैशिष्ट्य म्हणजे Modular Design व फिरती (Mobile) यंत्रणा, महत्वाचे म्हणजे क्षेपणास्त्र कोणत्याही दिशेला सहजतेने वळविता येणे तेही हवेतल्या हवेत त्यामुळे लक्ष्यभेद शक्यता खूपच वाढते. राजेन्द्र नावाचा बहुउद्देशीय Phased Array रडार व त्या बरोबर असणारी जामर विरोधी यंत्रणा (ECCM) यामुळेच आपल्या दिशेने येणारा वा आपल्या पासून बाहेर जाणारा धोका (Target) याचा लक्ष्यभेद निश्चित करतात. आकाश क्षेपणास्त्र डागल्यापासून लक्ष्यभेद होईपर्यंत रॅमजेट इंजिन कार्यरत असते त्यामुळे शेवटपर्यत त्याचा वेग राखता येतो. त्याचप्रमाणे शेवटपर्यंत कमांड व गाईडन्स मिळतो त्यामुळेच लक्ष्य अचुकतेने भेदले जाते.

आकाश क्षेपणास्त्राचे सुरवाती (सन १९९०) चे गुणधर्म – (संदर्भ मायाजाल अर्थात गुगल सर्च करून)

वजन ७२० किग्रॅ.

लांबी ५७८ सेंटीमीटर

व्यास ३५ सेंटीमीटर

बॉम्ब (Warhead) -High Explosive Prefragmented Warhead

बॉम्बचे वजन ६० कि.ग्रॅ.

बॉम्ब क्रियान्वयन – RF Proximity Fuse.

लक्ष्य गाठण्याची जास्तीत ज्यास्त उंची १८ कि.मी

पल्ला (Range) ३० कि.मी.

वेग स्वनातीत २.५ मॅक

SD element introduced.

याचाच उपयोग सुरक्षा कवच साठी करून Anti-Ballistic Missile interceptor Akash विकसित करून यशस्वी चाचणी द्वि–स्तरीय

सुरक्षा चाचणी केली. पृथ्वी वरील वातावरणात व वातावरणाच्या बाहेरून येणाऱ्या लांब पल्ला असणाऱ्या क्षेपणास्त्राचा अचूक वेध घेण्याची क्षमता सिध्द करून आपण समर्थ भारत बनविण्याकडे बरीचशी वाटचाल केली आहे.

ऑपरेशन सिंदूर मध्ये विविध स्वदेशी शस्त्रास्त्रे यांचा प्रभावी उपयोग करून आत्मनिर्भर भारत अभियान संरक्षण क्षेत्रात किती अत्यावश्यक आहे याची प्रचिती आली. कारण आत्मनिर्भरते मुळे आपले परदेशातील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी झाले आणि युद्धासाठी होणारा खर्च १० ते १५ पटीने कमी झाला. त्याच बरोबर महत्त्वाचे म्हणजे यामुळे जगातील भारताचे स्थान महाशक्ती म्हणून उदयाला आले, प्रभाव व मित्र देशांची संख्या वाढली. डॉ. कलाम नेहमीच आम्हाला म्हणत असत की, STRENGTH RESPECTES BY STRENGHTH याची प्रचितीच ऑपरेशन सिंदूर मुळे आली.

।। भारत माता की जय ।।

**काशीनाथ दामोदर देवधर**
**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डीआरडीओ (निवृत्त)**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

परमात्म्याशी जुळण्यासाठी लोक नाना प्रकार आजमावत असतात. ही चांगलीच गोष्ट आहे. एक खूपच सोपा प्रकार असू शकतो की, जेव्हा कधी आपण आनंदी वा दुःखी व्हाल तेव्हा त्याचे कारण अवश्य शोधा. आपल्या आनंदामागेही काही कारणे असू शकतात आणि दुःखाचीही कारणे असू शकतात, कोणावर तरी जबाबदारी टाकायलाच हवी. दोन्हीही स्थितीत ही जबाबदारी चार भागांत विभागून पाहा. प्रथम स्वतः कडे पाहा की, त्या आनंदात वा दुःखात आपली स्वतःची भूमिका काय आहे? कदाचित यामागे एखादी व्यक्ती असू शकते. तिचा शोध घ्या. तिसरी गोष्ट आपल्या प्रसन्नतेमागे वा दुःखामागे एखादी परिस्थितीही असू शकते व चौथी गोष्ट जी या सर्वांच्या वर आहे. ती ही की त्यामध्ये परमात्म्याला अवश्य शोधा.

कारण आपण ज्याच्यावर याची जबाबदारी टाकाल त्याच्याशी जुळू लागेल, चांगले असो वा वाईट विचारांमध्ये तोच उतरेल. अशा वेळी आपला आनंद वा दुःख भगवंताशी का जोडू नये. तसेही आपल्या मनात असते की, तो जे देईल ते आपल्यासाठी चांगलेच देईल. त्यामुळे अशावेळी जर जीवनात सुख आले असेल, तर ती त्याचीच देणगी असेल व दुःख आले तर तेही त्यानेच दिले असेल, असे मानून चाला.

**मराठीत दोन म्हणी आहेत.**
**"जगी सर्व सुखी असा कोण आहे..?"**

**दुसरी म्हण आहे.**
**"निर्लज्जम् सदा सुखी".**
**पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे दुस-या म्हणीत.**

# स्वातंत्र्यानंतर दिल्लीतील मुस्लीम लीगींची बंडाळी

- **डॉ. जोशी  यांचा खून, स्वातंत्र्यानंतर दिल्लीत दंगली सुरू झाल्या**

अखंड भारतातील मुस्लिम लीगचा अड्डा दिल्ली हाच होता. –लीग नॅशनल गार्ड– या मुस्लिम लीगच्या संघटनेने कारवायांना सुरुवात केली आहे अशी वार्ता पोलिसांना मिळाली होती. २१ ऑगस्ट १९४७ला दिल्लीच्या शहादरा भागातील एका मुस्लिम विद्यार्थ्यांच्या घरात बॉम्बचा स्फोट झाला. हा स्फोट बॉम्ब बनवण्याच्या गडबडीत झाला असावा. हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील मारामारीमध्ये बिर्ला मिल मध्ये काम करणाऱ्या चार मुस्लिमांचा मृत्यू झाला.  दिल्लीतील करोल बाग या हिंदू वसाहतीत ३ सप्टेंबरच्या रात्री अजून एक बॉम्बस्फोट झाला. करोल बागेत मजहबी धर्मांधतेचा हा स्फोट होता. खवळलेले मुसलमान रस्त्यावर आले. त्यांनी मोर्चा काढला. त्यांच्याशी चर्चा करायला डॉ. जोशी  गेले असता त्यांना डॉ. कुरेशी यांनी त्यांना गोळी घालून ठार मारले. याची प्रतिक्रिया प्रचंड प्रमाणात उठली आणि सब्जी मंडी, तुर्कमन गेट, पहाडगंज इत्यादी भागांमध्ये दंगल पसरली. गेल्या वर्षीच्या १९४६च्या नोव्हेंबर महिन्यात मुस्लीम लीगने केलेला घातक कारवायांचा प्रयत्न असफल झाला होता. परंतु मुस्लीम लीगचा प्रयत्न चालूच होता.  मुस्लिम लीगच्या गुंडांकडून शस्त्रास्त्रे जमविण्याचे प्रयत्न चालूच होते, याच्यासाठी अनेक पुरावे उपलब्ध झाले आहेत.

स्वातंत्र्य मिळून पुरता एक महिनाही झाला नव्हता. १९४७ च्या सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिल्लीत दंगली सुरू झाल्या. दिल्लीच्या जवळ जवळ सर्वच भागांमध्ये भोसका भोसकी आणि लुटमारीच्या घटना घडू लागल्या. मुस्लिम लीगचे गुंडे हे भरभक्कम शस्त्रांनिशी हल्ले करू लागले. त्यांनी स्वयंचलित शस्त्रे (बंदुका), गावठी पिस्तुले, रायफल्स, बॉम्ब आणि अन्य  मिसाइल्स (अस्त्र) यांचा सर्रास वापर केला. दारूगोळा विकणारे मुस्लिम व्यापारी केवळ त्यांच्याच लोकांना दारूगोळ्याची विक्री करत होते. दंगलीमध्ये हाजी ओबैदुल्लाह याचा महत्त्वाचा वाटा होता. त्याने दिल्लीमध्ये प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे आयात केली होती. मुस्लिम लोहार आणि मोटरगाड्यांचे मेकॅनिक यांच्या घरातसुद्धा भाले, गावठी बंदुका, व अन्य शस्त्रे बनविली जात होती.  छापेमारीमध्ये अनेक मुस्लीम वस्त्यांमध्ये १३ ट्रान्समीटर्स आढळून आले. मुस्लिम लीगचे मुखपत्र असलेल्या –डॉन–चा  छापखाना जमावाने जाळून टाकला.  त्यातून पोलिसांना एक जळका Signal Corps Radio Transmitter मिळाला. दिल्लीतील सब्जी मंडी या भागात एका भुयारात प्रचंड प्रमाणावर शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

- **सरदार पटेल यांचे स्वीय सचिव व्ही. शंकर यांचे मत**

स्वतः आय.सी.एस. असलेले व्ही. शंकर हे त्यावेळी उपपंतप्रधान व  केंद्रीय गृहमंत्री सरदार पटेल यांचे स्वीय सचिव होते. त्यांनी लिहिल्याप्रमाणे –

दिल्लीतील मुसलमानांनी मुस्लिम लीगच्या कार्यात पुढाकार घेतला होता. दिल्ली हाच मुस्लिम  लीगच्या विश्वाचा अड्डा होता; लीगच्या प्रचार यंत्रणेचा उगम होता. येथूनच लीगच्या सूचना निघत असत. मुस्लिम समाज हा अतिशय संघटित होता आणि काही भागांमध्ये त्यांची बहुसंख्या होती. शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा यांचा व्यापार करणारे बहुसंख्य लोक याच धर्माचे होते आणि कित्येक गुंड लोक येथूनच येत होते. अशा अफवा होत्या की, शहरातील मुसलमानांनी संघटित होऊन दिल्ली आपल्या ताब्यात घेण्यासाठी हिंसाचार करण्याची तयारी केली आहे. कारण एकेकाळी दिल्ली ही त्यांची राजधानी होती; संस्कृती व भाषा यांचेही माहेरघर होते. संपूर्ण वातावरण हे हल्ले आणि प्रतिहल्ले करण्याच्या मनःस्थितीत होते. अनेक मुस्लिम अधिकारी पाकिस्तानच्या सेवेत जाण्यासाठी इच्छुक होते. दिल्लीतील ५० टक्के कर्मचारी आणि जवळजवळ ७५ टक्के सशस्त्र पोलीस हे मुस्लिम समाजातूनच येत होते. आणि त्यांच्या मनात पाकिस्तानच होते. त्यामुळे आणीबाणीच्या काळात त्यांच्यावर विश्वास ठेवायची सोय नव्हती. आणि अशा वार्ता सातत्याने येत होत्या की, ते स्वतः त्यांच्या शस्त्रास्त्रांसह मुस्लिम पक्षाला जाऊन मिळणार आहेत. सैन्यदल सुद्धा उभे करणे शक्य नव्हते; कारण

फाळणीदरम्यान भारताच्या वाट्याला आलेली शस्त्रास्त्रे अजूनही पाकिस्तानमध्येच होती. सरदार पटेलांनी २८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९४७ दरम्यान कर्फ्यू लावला. त्यावेळी पंतप्रधान पंडित नेहरू व गवर्नर जनरल माऊंटबटन हे दोघेही दिल्लीबाहेर होते. पण ते आल्यावर एक –आणीबाणी समिती– स्थापन करून त्याचे प्रमुख माऊंटबटन यांनाच करण्यात आले. सरदार पटेल यांचे स्वीय सचिव व्ही. शंकर पुढे लिहितात, जर पटेलांना दिल्लीतील दंगली काबूत आणण्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले असते तर हे काम सरदार पटेलही करू शकले असते. पटेलांच्या मते परिणामांची तमा न बाळगता किंवा किती जीवित हानी होईल याचा विचार न करता कडक कारवाई करणे ही काळाची गरज होती. दंगलीच्या सुरुवातीपासूनच कमीत कमी बळाचा वापर करण्याचे तत्त्व बाजूला ठेवून कडक कारवाई करण्याची पटेलांची तयारी होती. मुसलमान जनतेशी संबंध असणार्या कोणत्याही कारवाईमुळे त्यांचा नेहरू व गांधींशी संघर्ष होण्याची शक्यता होती.

इकडे दिल्लीत ही धुमश्चक्री चालू असताना म. गांधीजींनी ८ सेप्टेंबरला कोलकाता सोडले व ९ सेप्टेंबरला ते दिल्लीला पोचले. त्यांनी विर्वासितांच्या छावण्यांना भेटी द्यायला सुरुवात केली. प्रत्येक दिवशी संध्याकाळी प्रार्थना झाल्यावर ते प्रवचन देत असत.

- **तुम्हाला जवळच्या नातेवाईकांना गमवावे लागले नाहीत!**

ही घटना खुद्द म. गांधीजींनीच सांगितली आहे. १० सप्टेंबर १९४७ या दिवशी म. गांधीजी आपल्या सायंकाळच्या प्रार्थना प्रवचनात म्हणाले, ....त्यानंतर मी दिवान हॉल, वेव्हेल कॅन्टीन आणि किंग्स वे येथे निराश्रितांच्या चावण्यांमध्ये गेलो. तेथे मी शीख आणि हिंदू निर्वासितांना भेटलो. पंजाबची मी मागे सेवा केली होती ते ती विसरलेले नव्हते. परंतु या सर्व छावण्यांमध्ये मला काही संतप्त चेहरे दिसत होते. त्या लोकांना क्षमा करता येऊ शकते. हिंदूंशी कठोरपणे वागल्याबद्दल ते माझ्याशी चिडून धारदार आवाजात बोलत होते. ते म्हणाले की, त्यांना जर अशा प्रकारच्या हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते, तसे मला लागलेले नाही आणि आमच्यासारखे पिता–बंधू अशा जवळच्या नातेवाईकांना गमवावे लागले नाही. ते लोक म्हणाले की, मला दारोदारी भीक मागावी लागली नाही. देशातील राजधानी दिल्लीत शांती आणि खुशाली प्रस्थापित करण्याकरता मी थांबलो आहे असे म्हणून तुम्ही आमचे समाधानात कसे करू शकता? असा प्रश्न त्यांनी मला विचारला. खरे आहे की, मरण पावलेल्यांना मी परत आणू शकत नाही.

गांधीजी हिंदुस्थानीत ३५ मिनिटे बोलले. हे भाषण ध्वनिमुद्रित करून नंतर रात्री दहा वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात आले.

- **हिंदुस्तानचे सर्व शक्तिनिशी रक्षण करणे ही संघाची इच्छा आहे... श्रीगुरुजी**

१२ सेप्टेंबर १९४७ ला दिल्लीतील प्रार्थना–प्रवचनात म. गांधीजी जे बोलले त्यातील खालील अंश –हरिजन–च्या २१ सेप्टेंबर १९४७च्या अंकात छापून आला तो असा....

.... शेवटी गांधीजी आणि डॉ. दिनशा मेहता यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुरुजींशी (मा. स. गोळवलकर) झालेल्या संभाषणाचा गांधीजींनी उल्लेख केला. गांधीजींनी त्यांना सांगितले की, या संघटनेचे हात रक्ताने भिजलेले आहेत. गांधीजींना आश्वस्त करत गुरुजी म्हणाले, हे खरे नाही. आमची संघटना कोणाचीही शत्रू नाही. मुसलमानांना मारण्याकरिता ती उभारलेली नाही. हिंदुस्तानचे आपल्या सर्व शक्तीनिशी रक्षण करणे इतकीच तिची इच्छा आहे. ती शांततेकरिता उभी आहे आणि तुम्ही हे प्रकाशित करा.

- **दिल्ली जिंकून त्यांना संपूर्ण भारताचा पाकिस्तान करायचा होता... म. गांधीजी**

मुसलमानांनी शस्त्रे गोळा केली आहेत आणि दिल्ली जिंकून त्यांना संपूर्ण भारताचा पाकिस्तान करायचा होता, हे वास्तव म. गांधीजींच्याही लक्षात आलेच होते. दिल्लीत झालेल्या १४ सेप्टेंबर १९४७च्या पार्थना–प्रवचनात ते म्हणाले,

....त्यांना निःशस्त्र करणे सरकारचे काम आहे. त्यांच्याकडील शस्त्रे काढून घेणे हे सैन्याचे काम आहे. त्यांना जर हिंदूबरोबर एकोप्याने राहायचे असेल तर त्यांनी आपल्या जवळील शस्त्रे सुपूर्द केली पाहिजेत आणि मुसलमानांनी आपली चूक कबूल केली पाहिजे. त्यांनी म्हणायला पाहिजे की, आमची इच्छा दिल्लीला जिंकून संपूर्ण भारताचा पाकिस्तान करण्याची होती; परंतु भारताचा पाकिस्तान होणे शक्य नाही, हे आता आमच्या लक्षात आले आहे. त्यांना आधीच पाकिस्तान मिळालेला आहे व यावर त्यांनी समाधान मानायला पाहिजे. आम्ही

पाकिस्तानमधील हिंदूंना वाचवू व त्यांना समाधानात ठेवू, असे त्यांनी म्हणायला पाहिजे.

- **काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांचे दंगलीविषयी वक्तव्य**

त्या वेळचे काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनी स्वतः मुस्लीम लीगच्या गुंडांच्या व्यापक तयारीसंबंधी म्हटले, मुसलमानांनी शस्त्रे एकत्र केली होती. घरांच्या झडत्या घेतल्यावर बॉम्ब, बंदुका व दारुगोळा यांचे मोठे साठे मिळाले होते. स्टेनगन्स, ब्रेनगन, मॉर्टर व वायरलेस ट्रान्समीटर देखील मोठ्या संख्येत मिळाले होते. या वस्तू गुपचूप तयार करणारे कारखाने पकडले गेले. अनेक ठिकाणी घमासान संघर्ष झाले. त्यामध्ये या हत्यारांचा बेधडक वापर करण्यात आला. पोलिस दलात मोठ्या प्रमाणावर मुसलमानांची भरती करण्यात आली होती. त्यामुळे हे दंगे नियंत्रणात आणायला सरकारला खूपच अडचणींचा सामना करावा लागला. या पोलिसातले अनेक जण आपली वर्दी व हत्यारे घेऊन फरार झाले व दंगेखोरांना सामील झाले. जे शिल्लक राहिले होते त्यांची निष्ठाही संदिग्ध होती. सरकारला इतर प्रांतांतून पोलीस व सेना बोलवावी लागली.

- **स्वयंसेवकांनी अशी वाचविली दिल्ली**

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा दिल्लीचे कमिशनर व विश्वविद्याल्याचे कुलपती मुसलमानच होते. त्यांच्या हवेल्या मुस्लिम लीगच्या कारवायांचे अड्डेच होते. १० सप्टेंबर १९४७ या दिवशी बंड करायची पूर्ण योजन येथेच शिजली. या योजनेचा प्रत्येक पैलूचा विचार करून त्याची टिपणेही काढण्यात आली होती. हे अधिकारी मुस्लिम असल्याचे माहीत असल्यामुळे स्वयंसेवकही मुसलमानांच्या वेषात नियुक्त केले गेले होते. त्यांना बातमी लागली की, सदर योजनेची सर्व कागदपत्रे कुलपतींच्या हवेलीतील तिजोरीत कुलूपबंद आहेत. ही कागदपत्रे मिळविण्याची योजना खोसला नावाच्या एका स्वयंसेवकाने आखली. त्यांच्या गटातील स्वयंसेवक मुस्लिम वेष परिधान करून निघाले. हे वाटते तितके सोपे नव्हते. कारण हवेलीवर मुस्लीम लीगी गुंडांचा पहारा होता. खोसला यांनी तिथे जाताच दुआ-सलाम ठोकला व सांगितले, आम्ही सर्वजण अलीगढहून आलो आहोत. येथे रात्रीचा पहारा देण्याची ड्यूटी आमची आहे, तुम्ही बिनधास्त झोपा. पहायावरचे कार्यकर्ते तेथून दूर झाले. खोसलांचे काही सहकारी पहायावर थांबले तर, काही आत तिजोरी हस्तगत करायला गेले. तिजोरी कोणत्या खोलीत, कोठे आहे, याची माहिती त्यांनी अगोदरच मिळविली होती. येताना ते एक ट्रकही घेऊन आले होते. तिजोरी हाती लागताच स्वयंसेवकांनी पोबारा केला. संघ अधिकायांनी आतील कागदपत्रे वाचताच ते थक्कच झाले. त्यामध्ये संपूर्ण सरकार व दिल्ली शहर उध्वस्त करून, हिंदूंचे हत्याकांड करण्याच्या योजना होत्या. ही सगळी कागदत्रे सरदार पटेलांकडे पाठविण्यात आली. ते कागद वाचताच सरदारांचे डोळेही विस्फारलेच! गुप्तचर विभाग पहिल्यापासूनच कसल्या तरी षड्यंत्राची सूचना देत होता. आता त्यांना याचे पक्के पुरावेच मिळाले. खूप जबरदस्त संघर्ष झाला. सैन्याने व स्वयंसेवकांनी दिल्ली वाचवली खरी, पण किमान शंभर स्वयंसेवक हुतात्मे झाले.

**डॉ. गिरीष आफळे**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

लोक तुम्हाला नेहमी सांगतील की, तुमच्या कामात, उपक्रमात किंवा प्रकल्पात मोठी जोखीम आहे. चालेल की न की नाही ते सांगता येत नाही. पण स्वप्न पाहायचे आणि ते प्रत्यक्षात आणायचेच नाही हीच खरे तर मोठी जोखीम असते. कधीच जोखीम कधीच अंगाशी येत नाही. सर्व बाजूंचा विचार करून घेतलेली जोखीम तुम्हाला यशाकडेच घेऊन जाते. शेवटी जोखीम स्वीकारल्याशिवाय यश मिळणार कसे, हा प्रश्न आहेच.

तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेतील एक अडचण म्हणजे पैशांची कमतरता. जसजसे वय वाढत जाते तसतसे स्वप्नांच्या पूर्ततेखेरीज अन्य अनेक गोष्टींवर आपल्याला खर्च करावा लागतो. हे वास्तव स्वीकारावे. रोजच्या खाण्यापिण्याचा, कुटुंबाचा खर्च दिवसेंदिवस वाढत असतो.

मग तुम्हाला तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेची गोष्ट हृदयाशी कवटाळून ठेवावी लागते. किती दिवसांसाठी ते माहीत नसे. पण एक नक्की, तुम्ही त्यासाठी बचत करून पैसा जमा करू शकता.

# इतिहासातील पुराण आणि पुराणातील इतिहास लेखांक ८

मागील लेखात विचारप्रवर्तक असे ७ मुद्दे दिले होते. आता त्यापुढील अजून १४ मुद्दे देत आहे :-

८) श्री शंकर महाराज हे पुराणात उल्लेखलेल्या जनक राजाच्या काळात अष्टावक्र अवतारी होते. भगवंताच्या व काळाच्या संकल्पानुसार ते एकोणिसाव्या शतकात प्रगटले.

९) नगरचे प्रसिद्ध ज्योतिषी रेखी गुरूजींनी अक्कलकोट स्वामी समर्थांच्या तळहातावरून अचूक पत्रिका मांडली होती. समर्थांनी त्यांची पाठ थोपटून आशीर्वाद दिला. त्यानुसार त्यांनी इ. स. ११४९ मधे देहावतार धारण केला होता.

१०) भगवान श्रीकृष्णाचे लाडके शिष्य उद्धव हिमालयात अद्याप तपस्येत असून त्यांना दत्तसत्पुरूष भेटले होते. आता मोजा वय!

११) गोंदवलेकर महाराजांना नैमिष्यारण्यात काही तपस्येतील सिद्ध भेटले ज्यांचे तप सहस्रावधी वर्षे चालू आहे. त्यातील एकाने तर विचारले होते की श्रीरामावतार व कृष्णावतार होऊन गेले का?

१२) अनेकांनी 'योगानंद परमहंसांचे आत्मवृत्त' हा ग्रंथ वाचला असेल. विश्वाचे आध्यात्मिक व्यवस्थापन व संतुलन अनेक दिव्य अवतारी आत्म्यांकडून कसे केले व चालवले जाते त्याची कल्पना येते. 'विश्वचालक महावतार बाबाजी व क्रियायोग परंपरा' हे दोन शब्द कानावरून गेले असतील. गेल्या दोनतीन हजार वर्षांचा काळ बाबाजींद्वारे चालवला जात आहे. कलियुगातील ते चालक आहेत. काहींनी त्यांचा जन्म इ. स. २०३ असा सांगितला आहे.

१३) युगांच्या व मन्वंतरांच्या कालमापनावरून पृथ्वीच्या वयाचे आकडे डोळे फिरवतील. मग प्रश्न पडतो की बाबाजींबद्दल आपण ऐकतो, पण त्यांच्या अगोदरच्या काळात कोणकोण चालक होते ? बाबांजीनी त्यांच्या काही उन्नत योगीशिष्यांना याबाबत अद्भुत कथन केले व दर्शन घडवले आहे. काही लक्ष वर्षे ही परंपरा चालू आहे.

१४) त्यांच्यापूर्वी ज्या सिद्धांनी कार्यभार सांभाळला त्यातील कदाचित काही नावे आपण ऐकली असतील. क्रियायोग परंपरेतील विश्वव्यवस्थापकांची ही यादी पहा – थिरूमुलर, रमादेवर, अगस्ती ऋषी, कोंकनावर, कमलामुनी, सत्तमुनी, करूवुरार, सुंदर नांदर, वाल्मिकी ऋषी, नंदीदेवर, पामबत्ती, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, बोगनाथर, पतंजली, चरककर्ता धन्वंतरी, कुटुंबाई, इदाईकाडर व सध्याचे महावतार बाबाजी व त्यांच्या भगिनी नागलक्ष्मीदेवी! यात बहुसंख्य तामिळ सिद्ध आहेत. या सर्वांनी घोर तपश्चर्या करून मसौरभसमाधीफ ही सर्वोच्च दिव्यावस्था प्राप्त केली. दिव्यदेह टिकवणे, अदृश्य होणे, सूक्ष्म देहाद्वारे वेगवान संचार, विचार जाणणे, निर्मिती करणे तसेच त्यास मूळ रूपात परिवर्तित करणे आदी अनेक अद्भुत शक्तींचा या उच्चावस्थेत समावेश होतो.

१५) महावतार बाबाजींनी नीळकंठन् यांना ऑक्टोबर १९५३ मधे सूक्ष्म देहाद्वारे हिमालयात नेऊन त्यांचा आश्रम (आपल्या भाषेत Head Office) दाखवला. हे ठिकाण बद्रीनाथच्या मागील बाजूस स्वर्गारोहिणीच्या जवळपास आहे. हा आश्रम चारी बाजूंनी उंच पहाडांनी वेढलेला असून त्यास 'गौरीशंकरपीठम्' म्हणतात. इथून सध्या विश्वचालन होत आहे.

१६) आता आपल्यासारखे व्यवहारी विचारतील की भविष्यातील हजारो वर्षांकरता उत्तराधिकारी तयार आहेत का ? होय. ही मोठी जबाबदारी घेण्यासाठी या आश्रमात चौदा शिष्यांचे प्रशिक्षण चालू आहे. आश्रमात दोन मोठे धबधबे असून मोठा स्नानासाठी तर छोटा जलपानासाठी आहे. कसलेही वैज्ञानिक दिवे नसतांना रात्रीच्या वेळी सुद्धा पूर्ण परिसर दिव्य प्रकाशाने उजळलेला असतो. एक अतिविशिष्ट गूढ

शक्ती बाबाजींच्या इच्छेशिवाय कुणालाही तिथे येण्यास प्रतिबंध करते. क्रियायोगाची आध्यात्मिक परंपरा पुढे नेण्यासाठी या चौदांची निवड आहे.

१७) नीळकंठन् यांनी निरीक्षण नोंदवले आहे की यामधे दोन जण विश्वचालनासाठी पात्र झाले आहेत – एक आहेत नागलक्ष्मीदेवी व दुसरे स्वामी प्रणवानंद ! एकंदरीत महाप्रचंड अध्यात्मविश्वाचा थांग लागणे, व्याप्ती कळणे व बिनचूक व्यवस्थापनाचे गूढ कळणे आपल्या आवाक्यापलीकडे आहे.

१८) भगवंतांच्या संकल्पानुसार बाबाजींच्या अगोदरच्या व्यवस्थापकांची माहितीही दिली गेली आहे. महावतार बाबाजींना सिद्ध बोगनाथर व अगस्ती ऋषींनी ज्ञान दिले होते. बोगनाथर ह्या तामिळ सिद्धाने दक्षिण भारतातील पलानीमलै पर्वतावर खडतर तपश्चर्या करून 'सौरभसमाधी' ही उच्चावस्था प्राप्त केली होती. सूक्ष्म देहाने व देहांतरसिद्धीद्वारे विश्वभरातील अनेक ठिकाणी भेट देऊन जीवांना उपदेश केला होता. असेही म्हणतात की त्यांनी स्वतः बनविलेल्या विमानातून चीन व इतरत्र उड्डाण केले होते व तेथील योग्यांना मार्गदर्शन केले होते. चिली–मेक्सिकोतील प्रचलित अनेक आख्यायिकानुसार त्यांच्या पूर्वजांना लांब झगा घातलेल्या दाढीधारी सत्पुरूषाने मार्गदर्शन केले होते. ते बोगनाथरच होते. कलियुगारंभी विश्वचालकांच्या सभेत कलियुगात आध्यात्मिक प्रगती कशी पुढे न्यावी याची जबाबदारी बोगनाथरांवर सोपवली गेली.

१९) बोगनाथरांचे गुरू कलंगीनाथर यांनी विचारमाध्यमातून संदेश पाठवून बोगनाथरांना चीनमधे बोलावून घेतले. त्यांनी तिथे एका मृत चिनी देहात प्रवेश करून उपदेश करण्यास सुरुवात केली. 'बो–यांग' नावाने ते ओळखले जाऊ लागले. कालांतराने तेच 'लाओ त्से' नावाने प्रसिद्ध झाले. चिन्यांना ताओईझम व तंत्रज्ञान यांची शिकवण दिली. पुढे कन्फ्यूशियस या शिष्याला प्रवीण केले व कार्य चालू ठेवण्यास सांगितले. ही ऐतिहासिक नावे आपल्या वाचनात आहेत. बोगनाथरांचे उत्तुंग ज्ञान थक्क करते. पस्तीस प्रकारच्या औषधींपासून कायाकल्प गोळी तयार करून सेवन केले ज्यामुळे सुवर्णशरीर व १२००० वर्षे देह टिकवण्याचे सामर्थ्य मिळवले. इ. स. पू. ४०० ते ५०० दरम्यान भारतात परत येतांना कैलाश पर्वतावर मुक्काम करून तब्बल सात लाख श्लोकांचा 'बोगर सप्तकांडम्' हा महान ज्ञानग्रंथ रचला. शिवाय ७००० श्लोकांचे हस्तलिखित अगस्तींकडे मूल्यमापनासाठी पाठवले होते. अगस्तींनी महान साहित्यकार्य असा शेरा दिला होता.

२०) महावतार बाबाजी आठ वर्षांचे असतांना बोगनाथर यांच्याशी त्यांची गाठ पडली. बाबाजींना ज्ञान देऊन पलानीमलै पर्वतावर बोगनाथर यांनी देहत्याग केला व सूक्ष्म रूपात कार्य चालू ठेवले आहे. योगी रामय्या म्हणतात की त्यांनीच शास्त्रज्ञ नील्स बोअर व आईनस्टाईन यांना अंतःस्फूर्ती पुरवून वैज्ञानिक सत्य प्रकटवले.

२१) वेदकालीन सप्तर्षींत उल्लेख असलेले व युगानुयुगे अस्तित्व टिकवलेले महान ऋषी अगस्ती यांचा महिमा अवर्णनीय आहे. तपस्वी, अपराजित योद्धा, धनुर्धारी व शिकारी हे सर्व गुण सामावलेले ! शिवपार्वती विवाहाच्या वेळी जमलेल्या गर्दीमुळे पृथ्वीचा समतोल ढळला. यास्तव शंकरांनी अगस्तीस दक्षिणेकडे पाठवले. अगस्तींनी विंध्याला आज्ञाच दिली की हिमालयापेक्षा उंच होऊ नकोस. यामुळे कैलास व हिमालयाचे स्थान अबाधित राहिले. त्यांनी तामिळ ज्ञानकेंद्र (विद्यापीठ) स्थापून त्याचे प्रमुख या नात्याने प्रचंड ज्ञानठेवा लिखित स्वरूपात मानवजातीला दिला. तामिळ व्याकरणशास्त्र, वैद्यक, औषधी, किमयाशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, रोगनिदान, मृत्यपूर्व सूचनांची लक्षणे, वनस्पतीशास्त्र, योग, मंत्रशास्त्र, प्रार्थना, गूढविद्या, तंत्रशास्त्र अशा अगणित शाखांमध्ये ग्रंथ लिहून भारतीय ज्ञानठेवा समृद्ध केला. अगस्तींनी तत्कालीन इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, कंबोडिया व अतिपूर्वेकडील अनेक देशात भ्रमंती केली.

(क्रमशः)

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈

# ऑपरेशन महादेव : तांत्रिक माग काढत संपवला दहशतीचा एक अध्याय

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये एप्रिलमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरून गेला होता. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला आणि देशभरात संतापाची लाट उसळली होती.

खोऱ्यात प्रत्येक वळणावर शोधमोहीम सुरू असताना हे दहशतवादी तब्बल ९६ दिवस कसे लपून राहिले, याचे उत्तर आता मिळाले आहे – चायनीज अल्ट्रा रेडिओ कम्युनिकेशन सिस्टीम मुळे. दहशतवाद्यांची ही एकच तांत्रिक चूक ठरली निर्णायक – ज्यामुळे ऑपरेशन महादेव शक्य झाले. या मोहिमेद्वारे लष्कर-ए-तोयबा च्या दहशतवाद्यांचा खात्मा झाला आणि त्यांचा प्रमुख हाशिम मूसा ला यमसदनास पाठविण्यात आले.

- **हल्ल्यानंतर गस्त वाढली, पण ठोस सुराग मिळत नव्हता**

१८ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण काश्मीर खोऱ्यात हाय अलर्ट जाहीर करण्यात आला. प्रत्येक चेकपोईंटवर कडक नजर ठेवली जात होती, जंगलांत तपासणी सुरू होती, पण एकही खात्रीशीर माहितीचा मागमूस लागला नव्हता.

- **तंत्रज्ञानच ठरले दहशतवाद्यांची कमजोरी**

सुरक्षा यंत्रणांनी शोध अधिक तांत्रिक स्वरूपात हाती घेतला. थर्मल इमेजिंग ड्रोन, ह्यूमन इंटेलिजन्स (HUMINT), सॅटेलाइट ट्रॅकिंग आणि सिग्नल इंटरसेप्शन तंत्रज्ञानाचा वापर करून दक्षिण काश्मीरचा चप्पा चप्पा शोधून काढला गेला.

याचदरम्यान एका जंगलात एक चायनीज अल्ट्रा रेडिओ कम्युनिकेशन सिस्टम कार्यरत असल्याचे आढळले. ही उपकरणे क्वचित वापरली जातात, आणि फक्त सतत एनक्रिप्टेड सिग्नल प्रसारित झाल्यास ती लक्षात येतात. हीच ती पहिली ठोस माहिती होती – की दहशतवादी तिथेच लपून बसले आहेत.

- **काय आहे चायनीज अल्ट्रा रेडिओ कम्युनिकेशन सिस्टम?**

हे एक चीनच्या लष्करी उपयोगासाठी विकसित केलेले उपकरण आहे, जे हाय फ्रिक्वेन्सी (HF) आणि अल्ट्रा हाय फ्रिक्वेन्सी (UHF) बँडवर काम करते. हे खूप मजबूत एनक्रिप्शन वापरते आणि डोंगराळ भागांमध्येही संवाद शक्य करते.

२०१६ मध्ये 'WY SMS' म्हणून याचा वापर सुरू झाला होता. लष्कर, जैश यांसारख्या संघटनांनी याचा वापर सुरक्षित संपर्कासाठी सुरू केला. या उपकरणातील सर्वात मोठा धोका म्हणजे त्याचे सिग्नल्स पकडणे किंवा अडथळा आणणे फार कठीण असते. म्हणूनच ही प्रणाली दीर्घकाळ सुरक्षा यंत्रणांच्या हद्दीबाहेर राहिली होती.

- **ऑपरेशन 'महादेव' : अचूकता आणि संयमाचं मिश्रण**

जेव्हा या रेडिओ सिग्नल्सचा माग काढण्यात आला, तेव्हा लष्कर आणि गुप्तचर यंत्रणांनी तत्काळ 'ऑपरेशन महादेव' राबवायचा निर्णय घेतला. या ऑपरेशनचं नाव ठेवण्यात आलं 'माउंट महादेव' या डोंगरावरून, जिथे दहशतवादी लपून बसले होते.

२८ जुलैच्या सकाळी, ऑपरेशनची सुरुवात झाली. भारतीय लष्कर, राष्ट्रीय रायफल्स, आणि जम्मू-कश्मीर पोलिसांच्या विशेष पथकांनी परिसराला घेरलं.



● **सहा तासांची चकमक – दहशतीचा शेवट**

सुरक्षादल आणि दहशतवाद्यांमध्ये सहा तास तीव्र चकमक झाली. AK-47 रायफल्स, ग्रेनेड्स, IED, आणि पहलगाम हल्ल्यात वापरलेले स्फोटक सापडले. यात लष्कर–ए–तोयबा चा टॉप कमांडर हाशिम मूसा ठार झाला, जो गेली तीन वर्षे भारतामधील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाइंड होता.

गुन्हेगाराची तांत्रिक चूकच वा सोडलेले. पुरावे त्याच्या पर्यंत पोहोचायला मदत करते. तसेच ह्या बाबतीत ही घडले.

या दहशतवाद्यांना आपली लोकेशन उघड होईल अशी शंका देखील नव्हती. त्यांचा या एनक्रिप्टेड तंत्रज्ञानावर इतका विश्वास होता की त्यांनी कोणतीही अतिरिक्त खबरदारी घेतली नाही. पण हाच अतिविश्वास त्यांच्या मृत्यूचं कारण ठरला.

● **९६ दिवस दहशतवादी कसे लपून राहिले?**

या यशस्वी ऑपरेशननंतर काही महत्त्वाचे प्रश्न पुढे आले आहेत:

१. दहशतवाद्यांना स्थानिक मदत मिळत होती का?

२. या प्रकारची चायनीज उपकरणं याआधीही काश्मीरमध्ये वापरली गेली आहेत का?

३. ही तंत्रज्ञान दहशतवादी संघटनांपर्यंत नियमितपणे पोहोचतंय का?

४. याची उत्तरं शोधण्याचे काम सुरक्षा यंत्रणांमार्फत चालू आहे.

पण एक गोष्ट स्पष्ट आहे – भारत आता फक्त प्रतिक्रिया देत नाही, तर दहशतीचा मुळापासून नायनाट करण्याच्या धोरणावर काम करत आहे.

◈ ◈ ◈

**विचारधन...**

व्यक्तिमत्व विकारांमध्ये वर्तन, विचार आणि भावना यांच्या अस्वास्थ्यकर पद्धतींचा समावेश असतो, व्यक्तिमत्व विकार आपल्या लोकांना अनेकदा तीव्र अविश्वास,सहानुभूतीचा अभाव, कमकुवत आत्म–नियंत्रण किंवा सामाजिक टाळणे यांसारख्या अतिरेकी व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्वाशी झुंजावे लागते, प्रत्येक बाबतीत, हे व्यक्तिमत्त्व गुण तुमच्या कल्याणावर आणि नातेसंबंधावर परिणाम करू शकतात. उच्च न्यूरोटिसिझम हा व्यक्तितमत्त्व विकारांशी संबंधित आहे. ज्यामध्ये आवेगपूर्ण वर्तन, तीव्र नकारात्मक भावना आणि इतरांशी संबंध राखण्यात अडचण येते. यामध्ये पैरानॉइड, असामाजिक आणि सीमावली व्यक्तिमत्व विकारांचा समावेश आहे. काही संशोधक ऑब्सेसिक कंपल्सिव्ह पर्सनॅलिटी डिसऑर्डर हा विवेकीपणाचा एक अस्वास्थ्यकर प्रकार मानतात, जिये तुम्हाला सुव्यवस्था, नीटनेटकेपणा आणि परिपूर्णतेबद्दल वेड लागते. त्याचप्रमाणे, कमी विवेकपणा, अनिश्चितता आणि आवेगपूर्णता हे असामाजिक आणि सीमावर्ती व्याक्तिमत्य विकारांशी संबंधित आहेत. सहानुभूती आणि सहमती. कमी सहमती म्हणजे इतरांवर खूप अविश्वास असतो. म्हणून ते पॅरानॉइड व्यक्तिमत्व विकाराशी जोडलेले आहे.

**प्रश्न जेव्हा अस्तित्वाचा येतो**
**तेव्हा मनाच नाही तर**
**तत्वाचं ऐकायचं असतं.**

# असून अडचण नसून खोळंबा

मराठीमध्ये एक म्हण आहे त्याचा प्रत्यय आता आपल्या सर्वांना गेले काही वर्ष येत आहे. पाणी ज्याला आपल्या जीवन म्हणून पण संबोधतो असं हे पाणी या सृष्टीच्या निरंतरपणातलं एक महत्त्वाचं साधन आहे. जे आपल्याला पावसाच्या रूपाने पुन्हा पुन्हा मिळत असतं. पण नियोजन अथवा विचार न करता केलेल्या कृती असल्या म्हणजे काय होतं याचं प्रत्यंतर आता सध्या येत आहे.

पाऊस सुरू झाला की त्याचे पुरात रूपांतर होऊन सर्वत्र त्याचा प्रादुर्भाव वाढून. त्याच्यापासून वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान, जीवित हानी होणं सुरु होतं. असे हे पाणी हे असून अडचण होत. वास्तविक पाहता जमिनीमध्ये मुरून त्याची साठवण्याची व्यवस्था आहे. त्या पद्धतीने ते साठण आवश्यक आहे. असं पूर्वी पाणी साठत पण होतं. पण माणसाचा हव्यास आणि त्याची भूक ही एवढी वाढली की जे शिलकीतला आहे, जे हजारो वर्षापासून जमिनीमध्ये साठलेल आहे ते पाणी पण माणसाने खोदून खोदून वापरायला सुरुवात केली आणि नविन पाणी मुरण कमी झाल.

मला आठवतंय १९६५–७० च्या दरम्यानचा काळ मी त्यावेळी पाचवी सातवीत असेन. त्यावेळी आम्हाला शाळेमध्ये विहिरींचे प्रकारांमध्ये ट्यूब वेल नावाचा एक प्रकार होता आणि ती ट्यूबवेल ऑस्ट्रेलियामध्ये मेंढपाळ लोक पाण्यासाठी वापरतात असा उल्लेख होता. आज तीच ट्युबवेल भारतातच नव्हे तर जगभरात सुरू झाल्या आहेत आणि त्याचे दुष्परिणाम पण दिसायला लागलेत. भूगर्भातला पाणीसाठा संपलेला आहे, त्यामुळे डिसेंबर जानेवारी महिन्यापासून कित्येक गावांमध्ये टँकरने पाणी पुरवायला लागतं. पाणी आज का उपलब्ध नाही याचा विचार सर्व दूर होत आहे. झाला पण पाहिजे,फक्त त्याप्रमाणे वागणूक होत नाही. तर हे असं का होतं याच्या मागचं एक महत्वाच कारण म्हणजे पुर्वी भारतामध्ये तरी शेती ही शेणखताच्या सहाय्याने होत असे. सगळीकडं पेट्रोल डिझेलची वाहन सुरू झाली आणि प्राण्यांच्या गाडीवरती सामान वाहून नेणे तसेच ट्रॅक्टरमधून शेतातील बैलांची काम करण सुरू झाल्यामुळे बैल व तत्सम प्राण्यांची आवश्यकता कमी झाली. व दुधासाठी परदेशी गायी पाहण्यास सुरुवात झाली. परिणामी प्राण्यांच्या शेणाची उपलब्धता कमी झाली आणि शेतामध्ये त्याचा वापर कमी झाला.

पश्चिमेकडील देशानी युद्धप्रसंगी वापरण्यासाठी जे काही विस्फोटक बनवले होते त्यांचा वेळेत वापर झाला नाही तर या विस्फोटकांची ताकद ही कमी होऊन आवश्यक कार्य करू शकत नाहीत आणि त्यामुळे ते नाश करायला लागतात. असे हे नाश करणे म्हणजे शंभर टक्के नुकसान, त्यामुळे तिथल्या संशोधकांनी त्या विस्फोटकांपासून काही रासायनिक खत तयार केली. ज्याच्या वापरामेळ शेतात उत्पन्न जास्त येत असं सर्वांच्या लक्षात आलं आणि त्याप्रमाणे भारतात पण शेणखताच्या अवलंबितेवर राहून असणारे शेतकरी व सरकार यांनी या रासायनिक खताचा वापर सुरू केला.

'अति सर्वत्र वर्जते' अशी एक म्हण आहे. त्याचे दुष्परिणाम हे लगेचच होत असतात. त्याप्रमाणे ह्या सृष्टीमध्ये त्याचे दुष्परिणाम दिसायला सुरुवात झाली. आता ह्या रासायनिक खतामध्ये १५ भाग पोटॅश व ८५ भाग हे क्षार घातले जातात की जे पिकाला त्रासदायक नसतात. हे क्षार पाण्यामध्ये विद्राव्य असतात परंतु पाण्याचे प्रमाण मर्यादित असल्यामुळे सर्व क्षार हे विरघळून पाण्यातून जात नाहीत तर हे जमिनीमध्ये तसेच राहतात आणि परिणामी जमीन ही कडक होते. अशी ही जमीन कडक झाल्यानंतर त्यामध्ये पाणी धारण क्षमता कमी होते, या उलट पूर्वी ज्यावेळी माती आणि शेण एकत्र असायचं त्यावेळी नुसत्या मातीपेक्षा नऊ पट पाणी धारण करून ठेवण्याची क्षमता या मिश्रणामध्ये असते. त्या मातीतलं शेणाचं प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी धारण क्षमता कमी झाली व दुसऱ्या बाजूने क्षाराचे प्रमाण वाढल्यामुळे जमिनीत पाणी मुरायचं कमी झालं. ते न मुरलेल पाणी जिथे उतार मिळेल त्या ठिकाणी वाहू लागलं. शेवट ते विरघळलेल्या क्षारासह नदीत गेल. महाराष्ट्र मध्ये सांगली नावाचा एक गाव आहे त्या गावचे पाणी गेल्या २५ –३० वर्षापेक्षा जास्त कालावधी हे पिण्यायोग्य नाही. तर असं हे क्षारयुक्त पाणी नदीत जातं. हे क्षार नदीत

साठतात व नदीमध्ये पाणी मुरायचं बंद होत आणि नदीला पूर येणे सुरू होत.

दुसरं शहरांमध्ये पूर निर्माण होतात. कोणत्याही सुशिक्षित व्यक्तीला शेती करणे हे नोकरी करण्यापेक्षा अवघड वाटू लागलं आणि शहरात वीज, पाणी व इतर सुविधा चांगल्या उपलब्ध असल्यामुळे शहरात लोकसंख्या वाढली. शहराच्या आजूबाजूच्या ज्या शेती होत्या त्या शेतीमध्ये पण घर निर्माण व्हायला लागली आणि शेती बंद झाल्यामुळे तिथं जे पाणी मुरायचं ते पूर्ण बंद होऊन ते पाणी रस्त्यावर येऊ लागलं. शहरांमध्ये सर्व जमीन ही वैयक्तिक असेल तर फरशी, कोबा यांनी व्यापली गेली आणि सार्वजनिक जमीन जी आहे ती रस्त्यासाठी सिमेंट आणि डांबर यांनी व्यापली गेली. त्यामुळे शहरांमध्ये पाणी मुरण हा प्रकार कुठेही नाही. परिणामी पडणार सर्व पावसाचं पाणी नदीत जात. पाऊस झाला की पूर आणी हे सर्व होण्यासाठी सर्वस्वी मनुष्य जबाबदार आहे.

अशा या दुष्परिणामांचा विचार करणाऱ्या काही जणांनी यावर मार्ग शोधून काढलेले आहेत. पहिला मार्ग म्हणजे रासायनिक शेती बंद करून सेंद्रिय शेती सुरू करणे.

हा मार्ग तसा लवकर मोठ्या प्रमाणात सुरू होणार नाही, कारण या पद्धतीची शेती करण्यासाठी आता जनावर पाळणे आवश्यक आहे. म्हणजे त्या शेतकऱ्याला शेतीच्या बरोबर अजून एक काम वाढणार आहे आणि आत्ताची परिस्थिती काम वाढण्यापेक्षा काय विकत मिळते हे विकत घेण्याकडे लोकांचा जास्त कल आहे, त्यामुळे याला काही मर्यादा येतात. परंतु या पाण्याच्या समस्येबरोबरच जे रासायनिक खतांमुळे अन्न तयार होतो धान्य तयार होतो ते विषयुक्त असतं आणि त्यामुळे सर्वत्र आजाराचं प्रमाण वाढलेल आपल्याला दिसतं. महाराष्ट्रातला कोल्हापूर जिल्ह्यातला एक तालुका शिरोळ तर भारतात पंजाब हे राज्य कॅन्सरग्रस्त झाले आहे. त्यामुळे आपल्या घरच्या पूरत का होईना विषमुक्त अन्न तयार करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी घरात लागणारे सर्व अन्नधान्य ही शेण आणि गोमूत्र याचा वापर करून निर्माण करणे आवश्यक वाटत.

दुसरा एक मार्ग जमिनीमध्ये पाणी मुरण्यासाठी जालना जिल्ह्यातील परतूर मंठा तालुक्यातील वातूर (watur) गावी असणारे प्राध्यापक डॉक्टर पुरुषोत्तम वायाळ सर यांनी शोधून काढला आहे. वास्तविक पाहता हा खेडेगावामध्ये संडास साठी शोष खड्डा म्हणून वापरला जातो त्या पद्धतीचाच खड्डा आहे, परंतु हा पाणी मुरण्यासाठी केला जातो. त्याला त्यांनी मजलताराफ असं नाव दिलं आहे. गेल्या बारा वर्षापासून ते स्वतः मपरम पूजनीय गुरुदेव आर्ट ऑफ लिव्हिंग सेव ग्राउंड वॉटरफ या नावाने काम करत आहेत. त्यांना स्वतःच्या २५ एकर शेतामध्ये वर्षात फक्त दोन पीक पाण्याच्या उपलब्धतेमुळे घेता येत होती व त्या २५ एकर पैकी पावसाच्या दिवसांमध्ये काही भाग हा कित्येक दिवस पाणी साठून रहात असल्याने चीबड व्हायचा. त्यामुळे त्यामध्ये पण उत्पन्न मिळायच नाही. या सर्वावर उपाय म्हणून त्यांनी पहिल्यांदा शेतातला पावसाचे वेळचा पाण्याचा वहायचा मार्ग शोधून काढला. शेताच्या ज्या बांधाला ते सर्व पाणी जाऊन साठे त्या ठिकाणी त्यांनी ४ फूट X ४ फूट X १० असा खड्डा तयार केला. त्या खड्ड्यामध्ये ट्रॅक्टरनं दगड गोटे गोळा करून ते आणून टाकले आणि तो खड्डा मातीने किंवा कशानेही न बंद करता तसाच उघडा ठेवला. पहिल्या वर्षी पाऊसाळ्या नंतर त्यांच्या ३० फूट खोल विहिरीला त्यापूर्वी डिसेंबर महिन्यापर्यंत पाणी असायच त्या ठिकाणी ष जानेवारीपर्यंत पाणी उपलब्ध झालं आणि दुसऱ्या वर्षी तर पूर्ण बाराही महिने पाणी उपलब्ध झालं.

हे पाहिल्यानंतर त्यांनी त्यांच्या २५ एकर मध्ये ३० असे ‘जलतारा’ शोष खड्डे निर्माण केले आणि आज त्यांच्या जमिनीमध्ये वर्षातील एकही दिवस पाण्याची उपलब्धता नाही असं घडत नाही.

हे झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या गावामध्ये, त्यांचे मित्रमंडळींमध्ये हा विषय मांडला. त्यावेळी त्यांच्या मित्रांच्या पण ही परिस्थिती लक्षात आली होतीच आणि त्यामुळे त्या गावांमध्ये बहुतेक सर्वांनी अशा पद्धतीचे ‘जलतारा’ खड्डे निर्माण केले. या एका खड्ड्यात पूर्ण पावसाळ्यामध्ये अडीच ते साडेतीन लाख लिटर पाणी हे मुरवलं जातं.

दुसरा फायदा असा आहे की पाणी तुंबल्यानंतर हे पाणी २४ तासांमध्ये जमिनीमध्ये मुरायला लागल्यामुळे त्यात असणाऱ्या पिकाचं होणार नुकसान वाचलं.

अशा दृष्टीने संपूर्ण गावांमध्ये सर्वजण बारमाही बागायती शेतकरी झाले. त्यानंतर त्यांनी पाच गावांमध्ये जिथे पाण्याचा पुरवठा व्यवस्थित नव्हता तिथे याची जागृती केली. पुढच्या वर्षी डोंगरावरच्या पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या ५० गावांमध्ये

त्यांनी जागृती केले आणि त्या गावातील टँकर दोन वर्षात बंद झाले. अशा दृष्टीने तालुक्यातील ८४ गावांची निवड करून त्या सर्व गावांमध्ये त्यांनी अशा पद्धतीचे पाण्याची बारमाही व्यवस्था स्वतःची स्वतः शेतकऱ्यांनी करण्याची सोय निर्माण केली आहे.

यासाठी डॉक्टर वायाळ सर हे जानेवारी ते मार्च महिन्यामध्ये प्रबोधन करतात. नवीन गावांमध्ये सर्वे करून एप्रिल मे मध्येशेतकऱ्यांना शेतात खड्डे घेऊन ते खड्डे भरून घेण्यासंबंधी मार्गदर्शन करतात.

काही कंपन्यांचा व्यवसाय हा पाण्यासंदर्भातला असतो. अशा कंपन्यांकडून त्यांनी मुरणाऱ्या पाण्यासंबंधी पाहणी करून घेतली, त्यावेळी जर एखाद्या क्षेत्रामध्ये साडेसातशे मिली पाऊस पूर्ण पावसात पडत असेल तर तीन लाख ६० हजार लिटर पाणी प्रति खड्डा मूरत असा त्यांचा अभ्यास आहे. यासाठी कुठलीही सरकारी पाण्याची स्कीम नको, तळ पण नको. सर्वजण पाण्याच्या दुर्भिक्षे पासून मुक्त झालेले आहेत.

मात्र यासाठी जे खड्डे आवश्यक आहे ते तीन प्रकारात घ्यावे लागतात. जमिनीचा काळेपणाचा जो थर आहे त्या थरावर ते अवलंबून आहे.

जिथे काळी जमीन आहे तिथे ६ X ६ X १० फूट खोल असा एकरी एक खड्डा घ्यावा, मध्यम जमिनीमध्ये ६ X ६ X ६ फूट खोल असा एक खड्डा आणि जिथं मुरमाड जमीन आहे ६ X ६ X ३ फूट खोल असे दोन खड्डे घेणे आवश्यक आहे

या शोष खड्ड्याचं पुनःर्जीवन (जशी ट्रॅक्टर अथवा दुचाकी चार चाकी गाडीची एक वर्षात एकदा आपण सर्विसिंग करतो त्याप्रमाणे) दरवर्षी करणं आवश्यक आहे.

खड्ड्यावर वाहून आलेली माती बाजूला करणे, जिथपर्यंत खड्ड्यातील दगडावर माती गेली आहे तेवढे दगड बाहेर काढून दोन तीन तासात वाळल्यानंतर साफ करून घेऊन पुन्हा भरणे आणि दगडावर माती किंवा दुसरं काहीही जाळी वगैरे टाकू नये. आज त्यांच्याकडं असं काम करण्यासाठी दीडशे तरुणांचा संच उभा राहिला आहे. त्यांचा फोन नंबर ९४२३४५८९८३ आहे. आपण या फोनवर संपर्क करून माहिती घेऊ शकता, आपण त्यांच्या ठिकाणी त्यांनी हे जे काही केलेले आहे ते पाहण्यासाठी वेळ घेऊन जाऊ पण शकता.

असाच दुसरा एक मार्ग जमिनीत पाणी पुरवण्याचा एका गावात एका व्यक्तीने केलेल्या आहे तो खालील प्रमाणे

गाव : उपळाई ठोंगे, ता : बार्शी, जि : सोलापूर. या एक गावानं एक अप्रतिम असा रेकॉर्ड केलाय. जलशोषक चर म्हणून एक पाणी मुरवण्याचा उपचार असतो, त्याचं साधारण आकारमान असतं ५ X ३'X २'. हा जलशोषक चर एकदा भरल्यास त्याची पाणी मुरवण क्षमता असते ३० हजार लिटर. एका पावसाळ्यात साधारण तो कमीत कमी १० वेळा भरतो. (जास्तीत जास्त जितका दिवस पावसाळा टिकेल तितका.) म्हणजे एक जलशोषक चर एका पावसाळ्यात सरासरी ३०,००० X१० = ३,००,००० तिन लाख लिटर पाणी जमिनीत मुरवू शकतो.

या गावाने गावातून बाहेर जाणाऱ्या सर्व रस्त्यांच्या कडेला, डोळ्यांना दिसेल तवर..., असे एकुण १० नाही १०० नाही तर तब्बल ३३४ जलशोषक चर खणलेत. म्हणजे

३,००,००० लिटर ३३४ चर =१० कोटी २ लाख लिटर!!!

एवढं पाणी या गावात फक्त या एका उपचारातून मुरत आहे...!!!

आताही गावात जाऊन पाह्यलं तर या खालील फोटोसारखं, डोळ्यांना दिसेल तिथवर, अनेक रस्त्यांच्या कडेला या अशे चर खणलेले दिसतात..!!

यापेक्षा वेगळा पण नदीमध्ये पाणी मुण्यासाठी केला गेलेला एक आणि त्यानंतर तो तिथल्या स्थानिक शेजारच्या गावांमध्ये पण अवलंबला गेलेला असा एक उपक्रम-सध्या उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. नदीतील वाळू (चोरांनी चोरली नसेल तर), दगड-गोटे दिसत असतात.

भूशास्त्र असे सांगते की नदीचा प्रवाह जमिनीच्या मऊ भागातून जात असतो व त्यामुळे ती खोल खोल होत असते व तिचे ऊंच किनारे तयार होतात. नदीच्या या पात्रात अनेक पावसाळ्यातील गाळ साचल्यामुळे व वर लिहील्याप्रमाणे पाण्यातून रासायनिक खतातील वाहून आलेले क्षार पात्राला जलाभेद्य करतात व पावसाळ्यातील नदीत वाहणारे पाणी जेवढे भूगर्भात जायला हवे तेवढे जात नाही.

सर्व शेतकरी उन्हाळ्यात शेत नांगरताना हे सर्वांनी पाहिलेच असेल त्यामुळे शेत नांगरावे लागते ही गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे , पण नदी नांगरणे हे ऐकायला कसेसेच वाटते ना?

त्यासाठी सामुदायिक ट्रॅक्टर चा उपयोग करून नदीची शक्य आहे तेवढी नांगरणी आवश्यक आहे! हे समजून घेऊन

२००० सालात नांदरखेडा येथील मोतीलाल पाटील (पटेल) तात्या. यांनी हे केल आहे आणि तिचे समकालीन मूल्य मात्र आजही तितकेच आहे.

शहादा तालुक्यातील गोमाई या नदीच्या काठावरचे डांबरखेडा हे गाव. गोमाई ही नदी मध्यप्रदेशातून वाहत सातपुड्याच्या डोंगररांगातून महाराष्ट्रातल्या प्रकाशा या गावी तापीला येऊन मिळते.

सर्वत्रच बऱ्याच विहिरी, बोअरवेलना नंतर पाणी येत नाही. असच चारसहा महिने जिवंत असणाऱ्या गोमाई नदीच्या काठावर असून देखील डांबरखेड्याच्या विहीरी, बोअर ह्या मृत झाल्या. पाचशे ते सातशेफुटापर्यंत जलस्तर खोल गेला. लोक बोअरची खोली तेवढी वाढवत होते, नवनविन बोअर काढत होते. पण पाणी वरती येत नव्हते. असे का? शेतकरी हैराण. कुणाकडे नीट उत्तर नव्हते.

नांदरखेडा येथील मोतीलाल पाटील (पटेल) तात्या यांना शहाद्याला जायला डांबरखेड्यावरून जावे लागते. त्यामुळे डांबरखेड्याची पाणी समस्या मोतीलाल तात्यांच्याही चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाली होती. तात्या हे पुणे विद्यापीठाचे १९७० चे एम एस्सी ॲग्री. ही समस्या सार्वजनिक व सार्वत्रिक होती. गावात नदी असून विहरी, बोअर कोरड्या होत्या. पण उत्तर कुणाकडे नव्हते.

खूप दिवसानंतरच्या आपल्या चिंतनाचा परिपाक तात्यांनी एकेदिवशी डांबरखेडा गावाच्या सरपंचांना सांगितला. त्यांना थोडाफार पटला व मग दोघांनी तो विचार लोकांपुढे ठेवला. समस्येचा मुळापर्यंत गेल्यावरच उत्तर सापडतात. तात्यांनी सांगितलेला उपाय नदी नांगरण्याचा अगदीच वेगळा होता. काहीसा वेडेपणाचा, पण त्यामागे अभ्यास, संशोधन आणि चिंतन होते.

डांबरखेडच्या लोकांसाठी तात्यांनी स्वतः डिझल पुरवले, ट्रॅक्टर, लाकडी नांगर, लोखंडी नांगर अशा साधनांनी गोमाई नदी उन्हाळ्यात नांगरायला सुरुवात केली. लोखंडी फाळ वाकले. चार किमी. नदी आडवी नांगरायचा हा अजब प्रयोग काहीसा चेष्टेचा विषय झाला. गावकऱ्यांनी फक्त फक्त एक किलोमीटर इतकीच नदी नांगरली.

जून कोरडा गेला, जुलैत पहिला पाऊस आला. मात्र गोमाईला पूर येऊन प्रतीवर्षाप्रमाणे तो तापीला भेटायला गेला नाही. नांगरलेल्या नदीने रात्रीच पावसाचे सर्व पाणी पिऊन टाकले. अवघ्या चोवीस तासात बोअरमधल पाचशे फुटावरचे पाणी नव्वद फुटावर आले.

तत्कालीन जिल्हाधिकारी असीमकुमार गुप्ता यांनी नदी नांगरण्याच्या या अभिनव प्रयोगाचे शिल्पकार म्हणून मोतीलाल तात्यांना वॉटर मॅन ऑफ शहादा असे संबोधून तात्यांचे तोंडभरून कौतुक केले होते.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य सचिव अजित निंबाळकर यांनी मोतीलाल तात्यांच्या या जगावेगळ्या प्रयोगाची पाहणी करून कौतुक केले.

नदी नांगरण्याची ही अभिनव कल्पना कशी सुचली? या विषयी सांगताना तात्या बोलले, पाणी खाली न झिरपता वाहून जाते. माझ्या अनेक वर्षांच्या अभ्यास आणि चिंतनातून मला समस्येचे हे कारण लक्षात आले.

खेतीया या मध्यप्रदेशातील शहारापर्यंतच्या अनेक गावातील लोकांनी नंतर सातत्याने गोमाई नदी नांगरली आहे, आणि वाहून जाणारे पाणी आपल्याच गावात जिरवले आहे. हे तात्यांच्या कल्पक प्रयोगाचे फलित आहे.

निराश न होता, आत्महत्येचा पर्याय न अवलंबता शेतकऱ्यांनी आपल्या समृद्धीचा जलस्तर जिवंत करण्यासाठी काय करता येईल याचा शोध घेतल्यास उत्तर नक्की सापडते. मोतीलाल (तात्या) पटेल, डॉ. पुरुषोत्तम वायाळ सर या माणसांनी परिपक्व विचार करुन कृती केली आणि यश आले.

माझी सर्वाना विनंती आहे की हे प्रत्येक शेतकर्याने व गावाने केल तर सर्व जण पाण्याच्या समस्येतून मुक्त होईल. महिलांचे डोक्यावरून/टँकरने पाणी वहायचे काम वाचेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, बेरोजगारी दूर होईल, बळीराजाला आत्महत्या करण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही पण त्यासाठी आधी हे केलेच पाहिजे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे ही समर्थ रामदास स्वामींची प्रसिद्ध ओळ आहे. याप्रमाणे आपणा सर्वांसमोर मांडणे हे माझे काम.

या निमित्ताने का होईना यावर विचार व योजना होऊन सर्वत्र अंमलबजावणी व्हावी हीच एक इच्छा मनी ठेवतो.

**अजित परांजपे**

# जनपळभर म्हणतील हाय हाय...

राजकवी म्हणून मान्यता पावलेले, स्वातंत्र्यपूर्व काळातील एक जेष्ठ आणि प्रतिभावान कवी, कै. भास्कर रामचंद्र तांबे उर्फ भा रा तांबे. यांची एक अतिशय भावपूर्ण आणि सोप्या भाषेत, अतिशय गहन अर्थ दडलेली कविता. या कवितेला १८ ऑगस्ट १९२१ साली १०० वर्षे पूर्ण झाली. म्हणजे आता आजमितीला १०४ वर्षे होऊन सुद्धा तिचं महत्व चिरंतन राहीलं आहे. 'जन पळभर म्हणतील हाय हाय' ही भावकविता आम्हाला माध्यमिक वर्गात असतांना अभ्यासाला होती. खरं तर माध्यमिक वर्ग म्हणजे साधारण ८वी ते १० वी हे वर्ग. यावेळी आपले वय १३–१५ वर्षे असते (साधारण सगळं सुरळीत चालू असेल तर). या वयात नुकतंच जग बघायला सुरुवात केलेली असते. फुलपाखरा सारखं खेळण्या बागडण्याचंच हे वय असतं. आणि अशा वयात एवढ्या उच्च आणि पराकोटीचं आत्मभान देणारी ही अतिशय संवेदनशील कविता, खरं तर डोक्यावरूनच गेलेली असते. पण, आपल्या जाणकार शिक्षण तज्ज्ञांपुढे आपण काय बोलणार. त्यात मराठी भाषा शिक्षक, कविता किंवा काव्याची सौंदर्यस्थळं समजावून देण्यापेक्षा, तिच्यातील व्याकरणावरच जास्त भर देऊन, ते शिकवणं नीरस करून टाकतात. काय ते वृत्त, छंद आणि मात्रा, शार्दुलविक्रीडीत काय, दिंडी वृत्त काय मुक्त छंद काय.. सगळा सगळा नुसता छळवाद असतो. या सगळ्यातून जमलं तर काव्याचा आस्वाद. आपणही शालेय जीवनात हेच अनुभवलं असणार हे नक्की.

आता असं पहा, कि बाल मानसशास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार, व्यक्तीला साधारण ३ऱ्या वर्षांपासून 'स्व' ची जाणीव, म्हणजेच अहंकाराचा (जादूई परिस(?)) स्पर्श होतो. आणि नंतर उभ्याचे आडवे होऊन अनंतात विलीन होईपर्यंत तो टिकून राहतो. व्यक्तीचं अवघं आयुष्य हा 'अहंकार' व्यापून राहतो, आणि शेवटी त्याच्या प्रभावाखाली आणि त्याच्या अस्तित्वाच्या छायेतच, ती व्यक्ती यशस्वी झाल्यास, उत्तरोत्तर, व्यक्तिगत आयुष्यात प्रगती साधते, नाही तर रसातळाला पण पोहोचू शकते. माझं तर पुढे असंही म्हणणं आहे, की, कित्येकांच्या जगण्याचं उद्दीष्ट हा अहंकारच ठरवत असतो. ९०% लोकांना अहंकारामुळे, केवळ, माझ्या असण्यामुळेच हे जग चालले आहे, असा साक्षात्कार होत असतो. पुढे मी या जगातून नाहीसा झाल्यावर, माझ्यावर अवलंबून असलेले हे जग कसे चालणार, या विचाराने चिंताक्रांत होतो. खरं तरं असं काहीच होत नाही. कोणामुळे कोणाचेही काही अडून राहात नसते. हे जग, त्याचा व्यापार, हे सगळं निरंतर चालूच रहाणार असतं. आता इतका उदात्त आणि शाश्वत विचार मांडणारी, ही कविता, आपल्या एवढ्या लहान वयात आपल्याला अभ्यासाला मिळत असेल, आणि त्यावेळी, ती आपल्या डोक्यावरून जात असेल, तर हे या प्रतिभावंत कवीचं अपयश नसून, ते, असा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञाला आहे. असो. पण, म्हणून या कवितेचं महत्व अजिबात कमी होत नाही.

अगदी साध्या आणि सोप्या शब्दात, भा. रा. तांबे यांनी हे चिरंतन वास्तव आपल्या समोर मांडलं आहे.

जन पळभर म्हणतील हाय हाय  
मी जाता राहील कार्य काय?  
जन पळभर म्हणतील हाय हाय  
मी जाता राहील कार्य काय? ।।धृ।।

अरे, य:किंश्चित मानवा, तू देहाने या जगातून जेव्हा नाहीसा होशील, मातीला मिळशील, त्यावेळी, लोक अगदी क्षणभरच त्याचं दुःख व्यक्त करतील, पण जिवंतपणी मात्र तुला उगाचच वाटत असतं, की, मी गेल्यानंतर माझं कार्य कोणी आठवेल का? हे कार्य पुढे कोणी चालवेल का? मी अहोरात्र कष्ट करून मिळवलेली एवढी संपत्ती, माझ्या मागे, नीट सांभाळली जाईल ना? किंबहुना या जगात दुसरा पर्यायच नाही, असाही तुझा गोड (गैर) समज असतो.

सूर्य तळपतील, चंद्र झळकतील;  
तारे अपुला क्रम आचरतील,  
असेच वारे पुढे वाहतील,  
होईल कांहिं का अंतराय? जन पळभर ।।१।।

कवी, जग अव्याहतपणे (तुझ्याविना) चालतच रहाणार आहे, हे पटवून देतांना चंद्र, सूर्य आणि ताऱ्यांच्या अढळ अस्तित्वाचं सुंदह उदाहरण आपल्याला देतात. तू गेल्यावर सुद्धा सूर्य असाच नित्यनेमाने तळपत रहाणार, रात्रीच्या अंधःकारात, चंद्र त्याच्या शीतल प्रकाशाने झळकून अंधार दूर करणार आहे. तारे आपलं मार्गक्रमण करत राहणार आहेत. वारे पण असेच नित्यनेमाने वाहणार आहेत. या सगळ्यात काही खंड पडणार आहे का? नाही ना? मग आता तूच विचार कर की तूझ्या नसण्याने काय फरक पडणार आहे?

मेघ वर्षतील, शेतें पिकतील,
गर्वानें या नद्या वाहतील,
कुणा काळजी कीं न उमटतील
पुन्हा तटावर हेच पाय ?
जन पळभर...।। २ ।।

वर्षा ऋतूत पाण्याने गच्च भरलेले मेघ नेहमीप्रमाणेच बरसतील. त्यामुळे बळीराजाची शेतं पिकतील. पाण्याने तुडुंब भरलेल्या नद्या गर्वाने, काहीसा तुझ्या ठायी असलेला अहंकार उराशी बाळगून, समुद्राला भेटायला धावतील. त्या नद्यांच्या तटावर तुझे हेच पाय पुन्हा लागतील का याची काळजी करत त्या धावायचं थांबतील का?

सगेसोयरे डोळे पुसतील,
पुन्हा आपल्या कामी लागतील,
उठतील, बसतील, हसुनि खिदळतील,
मी जातां त्यांचें काय जाय ? जन पळभर..।।३।।

आता कवी, निसर्गातील गोष्टींचं उदाहरण देऊन, पुन्हा एकदा व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांच्या मनोवृत्तीचे दर्शन घडवतात. ते म्हणतात की, तू गेल्यावर, तुझ्या अगदी जवळचे सगेसोयरे, थोड्या वेळ डोळ्यांतून अश्रू गाळतील, आणि नंतर डोळे पुसून एकदा आपल्या रोजच्या कामाला सुरुवात करतील. उठबस सुरु करतील, हसणं खिदळणं सुरू करतील. मी जर गेलो (इथे त्यांना खरं तू गेल्यावर असं अभिप्रेत असावं) त्यांचं काय जाणार आहे?

राम-कृष्णही आले; गेले !
त्याविण जग का ओसचि पडलें ?
कुणीं सदोदित सूतक धरिलें ?
मग काय अटकलें मजशिवाय ?

अशा जगास्तव काय कुढावें ?
मोहिं कुणाच्या कां गुंतावें ?
हरिदूता कां विन्मुख व्हावें ?
कां जिरवुं नये शांतींत काय ?

आता या शेवटच्या कडव्यात कवी फारच सुंदर असा अध्यात्मिक असा विचार मांडतात. ते म्हणतात कि, उत्पत्ती, स्थिती आणि लय या अवस्था देवांच्या मानव रूपाला ही चुकल्या नाहीत. राम आणि कृष्ण यांसारखे देव सुद्धा जन्माला आले, आणि त्यांचे कार्य करून अंत पावले. ते गेल्यानंतर तरी कुणाचं काही अडलंय का? त्यांच्या जाण्याने जग काही ओस पडलंय का? का त्यासाठी कोणी सदासर्वकाळ सुतक पाळलंय ? मग, माझ्यावाचून तरी कोणाचे काय अडावे? आणि मग, अशा अव्याहतपणे चालणाऱ्या जगासाठी, ज्यात आपले जीवन क्षणभंगुर आहे, हे माहीत असूनही का कुढायचं आणि मनातल्या मनात दुःखी कष्टी रहायचं? कोणाच्या तरी मोहात का गुंतून पडायचं? फक्त एकच शाश्वत असलेल्या परमेश्वराच्या भक्तीला पारखे का व्हावे? अशा निरलस भक्तीत स्वतःला मनःशांती मिळवण्यासाठी गुंतवून का घेऊ नये?

या कवितेचं भावगीतामधे रूपांतर होऊन,तीला संगीतकार वसंत प्रभू यांनी सुंदर अशी चाल लावली आणि लतादीदींनी ते तितक्याच आर्ततेने गायलं आहे. दुसरं असं कि, कवितेचं गाणं करतांना ते विशिष्ट लय-तालात बसवण्यासाठी काही शब्दांशी तडजोड करावी लागते. पण इथे तर ती पण करावी लागलेली नाही. या कवितेचा खरा अर्थ आता निवृत्तीच्या काळात समजायला लागला आहे. एवढंच जर मनुष्य जन्माला येऊन जगल्यानंतर, तुम्हाला इतक्या थोडक्या कालावधीमध्ये सगळे विसरून, जगरहाटी पुन्हा तशीच चालू रहाणार असेल, तर आयुष्यभर हा अहंकार, ही धडपड कशासाठी?

तर, अशी ही जीवनाचं क्षणभंगुरत्व अधोरेखित करणारी, आणि वृथा अहंकार बाळगू नका असा चिरकाल संदेश देणारी, सहज सोपी दिसणारी, पण आचरणात आणण्यासाठी तितकीच अवघड अशी ही भावकविता. आपण आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर असा, पण पुढे पुढे जात असताना ही कविता कायम उराशी बाळगून, हे चिरंतन वास्तव स्वीकारा, आणि मार्गक्रमण करत रहा. म्हणजे आपले पाय कायम जमिनीवरच रहायला मदत होईल.

**ब्रह्मानंद घुगरे**

◈ ◈ ◈

# राष्ट्रकूट राजांची मंदिरे

बदामी चालुक्यांचा पराभव करून दख्खनच्या गादीवर आले ते राष्ट्रकूट राजे. ८ व्या शतकापासून ते पुढे दहाव्या शतकापर्यंत या घराण्याने राज्य केले. दंतिदुर्ग हा या घराण्याचा प्रथम राजा. पुढे राष्ट्रकूट घराण्याच्या अनेक राजानी स्थापत्य आणि कलेत मोलाची भर घातली आणि भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अजरामर अशी भर घातली.

राष्ट्रकूट घराणे नेमके कुठले याबद्दल संशोधकांच्यात अनेक मतभेद आहेत. कर्नाटकातील मालखेड या शहरात त्यांची राजधानी होती त्यामुळे कदाचित राष्ट्रकूट राजांचा उगम हा कर्नाटकात झाला असणार. परंतु सुमारे २०० वर्षे या राजसत्तेने महाराष्ट्र, कर्नाटक तसेच आंध्रप्रदेशातील बऱ्याच मोठ्या भूभागावर राज्य केले. या तिनंही राज्यात राष्ट्रकूट राजानी उभारलेली मंदिरे आपल्याला पाहायला मिळतात.

मंदिर स्थापत्याच्या बाबतीत म्हणायचे झाले तर राष्ट्रकूट राजे हे बदामीच्या चालुक्यांचेच उत्तराधिकारी. राष्ट्रकूट राजांची मंदिरे ही द्राविड शैलीतच बांधलेली आपल्याला दिसून येतात मात्र नुसती बांधीव मंदिरे न बांधता त्याचबरोबरीने कोरीव लेणी खोदण्याकडे देखील राष्ट्रकूट राजांचा कल होता असे दिसते. राष्ट्रकूट राजानी बांधलेली बहुतांश मंदिरे ही शिव देवतेची आहेत त्यामुळे राष्ट्रकूट राजे हे शैव होते हे आपल्याला समजते.

कर्नाटकात पट्टदकल, कुकनूर, सोगल, ऐहोले येथे राष्ट्रकूट राजांची काही मंदिरे आपल्याला दाखवता येतात मात्र राष्ट्रकूट राजांच्या काळात कोरले गेलेले एक अतिशय देखणे काम म्हणजे वेरूळ येथील कैलास लेणे. आजच्या आणि पुढील महिन्याच्या लेखाचा विषय कैलास लेण्याभोवतीच केंद्रित असणार आहे इतके हे लेणे भव्य आणि देखणे आहे.


आधी कळस आणि मग पाया अशा पद्धतीने खोदलेले हे लेणे मंदिर. चालुक्यांच्या काळात देखील लेणी खोदली जात परंतु त्या लेण्याला कोणत्याही प्रकारचे शिखर नसे. राष्ट्रकूटांनी दगड कोरून लेणे तयार करणे या कलेला एका मोठ्या उंचीवर ठेवले आणि जणू काही बांधीव मंदिर आहे अशा थाट संबंध मंदिर कोरून तयार केले.

मध्ययुगीन मराठी परंपरेत एक आख्यायिका आढळते जी कैलास मंदिराच्या बांधणीशी संबंधित असल्याचे दिसते. या आख्यायिकेचा सर्वांत प्राचीन उल्लेख कृष्ण याज्ञवल्क्य (सु. इ.स. १४७०–१५३५) यांच्या कथा–कल्पतरू या ग्रंथात आढळतो. या कथेनुसार, स्थानिक राजाला एका गंभीर आजाराने ग्रस्त केले होते. त्याची राणी एलापूर येथे स्थित घृष्णेश्वर महादेवाला पतीच्या आरोग्यासाठी प्रार्थना करू लागली. तिची मनोव्रत्ती अशी होती की, जर देवाने तिची मनोकामना पूर्ण केली, तर ती एक मंदिर बांधून देईल, आणि मंदिराचे शिखर दिसेपर्यंत उपवास धारण करील. राजाचा आजार बरा झाल्यानंतर राणीने तत्काळ मंदिर उभारण्याची विनंती केली. परंतु, शिल्पकारांनी सांगितले की शिखरसह संपूर्ण मंदिर उभारण्यासाठी अनेक महिने लागतील. त्यावेळी कोकास नावाच्या एका शिल्पकाराने राजाला आश्वासन दिले की राणीला एका आठवड्याच्या आत मंदिराचे शिखर दिसेल. त्याने परंपरागत पद्धतीने पायथ्यापासून बांधणी न करता, एका विशाल खडकावरून वरून खाली कोरीव काम सुरु केले. अवघ्या आठवड्याच्या आत त्याने मंदिराचे शिखर पूर्ण केले, ज्यामुळे राणीला उपवास सोडता आला. हे मंदिर राणीच्या नावावरून माणिकेश्वर म्हणून ओळखले जाऊ लागले. ढवळीकर यांच्यामते कोकास हेच या लेण्याच्या स्थपतीचे नाव असू शकेल व ही जी कथा चालत आलेली आहे त्यानुसार कदाचित मंदिराचे मूळचे नाव माणिकेश्वर देखील असू शकेल.

छत्रपती संभाजीनगर जवळील सध्याच्या वेरूळ व पूर्वीच्या एलापुरा या गावानजिकच्या डोंगरात हे लेणे कोरलेले आहे. इथे एकूण ३४ लेणी आहेत. यामध्ये १–१२ क्रमांकाची लेणी हि बौद्ध पंथाची आहेत. पुढे १३ ते २९ ही लेणी हिंदू तर ३०–३४

क्रमांकाची लेणी ही जैन पंथाची आहेत. राष्ट्रकूट राजा कृष्ण यांच्या कारकिर्दीत म्हणजे आठव्या शतकात कैलास लेण्याची निर्मिती झाली असे म्हणतात. याबद्दलचा ठोस पुरावा आपल्याकडे उपलब्ध नाही. इतिहास अभ्यासकांच्या मते विविध राष्ट्रकूट राजानी या कैलास लेण्याच्या निर्मितीमध्ये योगदान दिले. हे जर खरे पकडले. तर कैलास लेण्याचे काम हे सुमारे १००–१५० वर्षे हळू हळू करत सुरु होते असेच म्हणावे लागेल.

कैलास लेणे हे द्राविड शैलीत कोरलेले आहे. असे म्हणतात की या लेण्यांवर पट्टदकल येथील विरुपाक्ष आणि कांची येथील कैलासनाथ मंदिराचा प्रभाव आहे. कदाचित या लेण्याच्या निर्मितीत चालुक्य आणि पल्लव साम्राज्यातील कारागिरांचा देखील सहभाग असू शकतो. मंदिरात प्रवेश करण्यासाठी आपल्याला एका छोट्या गोपुरातून जायला लागते. या दरवाजाच्या उजव्या बाह्य बाजूस सर्व विष्णू देवतेशी निगडित मूर्ती आहेत तर डाव्या बाजूस शैव देवतेशी. या मूर्ती बघत बघत आपला प्रवेश होतो ते मंदिर पटांगणात. आपले स्वागत करते ती म्हणजे अतिशय देखणी अशी गजलक्ष्मीची मूर्ती. मुख्य मंदिर हे शिवाला समर्पित



आहे. मंदिराच्या अधिष्ठानावर आपल्याला हत्ती प्रतिमा दिसतात. जणू काही हे हत्ती या मंदिराचा भार आपल्या खांद्यावर तोलून धरत आहेत की काय असेच वाटते.

मंदिराला बाह्य बाजूने प्रदक्षिणा घालत असताना आपल्याला विविध शिल्पपट दिसून येतात आणि त्यामध्ये रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांचे भले मोठे पट आहेत. संपूर्ण रामायण आणि महाभारत हे संक्षिप्त रूपात आपल्यासमोर मांडण्याचा शिल्पकारांचा प्रयत्न हा वाखाणण्यासारखा आहे. महाभारत शिल्प हे बरेच खराब झाले असले तरी रामायणातील प्रसंग मात्र नीट ओळखता येतात.

हे प्रसंग पाहून आपण पायऱ्या चढून मंदिरात प्रवेश करतो. मंदिराच्या मंडपात दगड कोरून खांब काढले आहेत. हे मंदिर पूर्वी रंगवलेले होते. मंदिराच्या छतावर आपल्याला आजही काही चित्रे पाहायला मिळतात. या रंगाचे व चित्रांचे एक श्रेय हे अहिल्याबाई होळकर यांच्याकडे देखील जाते. मंदिर आवारात ध्वजस्तंभ आहे तसेच इतर अनेक देवीदेवतांच्या आखीव रेखीव मूर्ती देखील. यातील किंवा म्हणजे रावणाचे गर्वहरण ही मूर्ती तर संपूर्ण वेरूळ शिल्पकलेचा एक अजोड नमुना आहे. पुढील लेखात आपण कैलास लेणीतील काही शिलपांची माहिती घेणार आहोत.

कैलास लेणे पाहायला एक दिवस देखील कमी पडेल आणि अभ्यासपूर्ण पाहण्यास अनेक महिने लागतील एवढे निश्चित. कधी वेरूळ लेणीत जाण्याचा योग आला तर थोडा निवांत वेळ ठेवा आणि किमान चांगले ३–४ तास घालवून योग्य गाईडसोबत हे मंदिर डोळस नजरेने फिरा. मनाला समाधान देणारी अशी ही भ्रमंती असेल एवढे निश्चित

**शंतनू परांजपे**


स्वतःच्या कुटुंबासाठी हवे
स्वतःचे घर,
ठेवा विश्वास जनसेवेच्या
'घरकुल' कर्जावर !
जनसेवा घरकुल कर्ज
रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)
* अटी लागू
आकर्षक व्याजदर
तत्पर सेवा
अल्प प्रोसेसिंग फी
रु. 2 कोटींपर्यंत कर्ज
संपर्क क्र. - 84 85 87 12 52
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त
Date of Publication : 26/08/2025 and
Date of Posting : 28/08/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## * हिंदुबोध जाहिरात दरपत्रक *

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## * हिंदुबोधची वर्गणी *

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१